## लोकांना धमकाविणाऱ्या आरोपीस अटक

**नागपूर :** हातात चाकू घेऊन लोकांना धमकाविणाऱ्या आरोपीला कळमना पोलिसांनी अटक केली. मोहम्मद आरीफ ऊर्फ बंगाली मोहम्मद मिजान शेख असे आरोपीचे नाव आहे. कळमना पोलिसांचे तपास पथक १२ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना कळमना मार्केटमधील जड वाहन पार्किंग परिसराजवळ आरोपी मोहम्मद शेख (२८, रा. आजरी माजरी, हस्तीनापूर) शस्त्रासह लोकांना धमकावत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन धिंगाणा घालणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याजवळून चाकू जप्त केला.

गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# नागपूर

नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/९

## चोरट्याने लांबविली एक लाखाची रोकड

**नागपूर :** घराला कुलूप न लावता बाहेर गेलेल्या एका व्यक्तीच्या घराच्या दाराची कडी उघडून कपाटातील १ लाखाची रोकड चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी वाठोडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. वाठोडा हद्दीतील रोशनबाग, खरबी येथे राहणारे मोहम्मद कैफ मेहमूद खान (२५) हे ११ जुलैला सायंकाळी ६ वाजता घराला कुलूप न लावता फक्त कडी लावून कामानिमित्त घराबाहेर गेले. रात्री १० वाजता ते परत आले. तेव्हा त्यांना घरी चोरी झाल्याचे लक्षात आले. अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दाराची कडी उघडून बेडरूममधील कपाटातील रोख १ लाख रुपये चोरून नेले.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# जनसुरक्षा विधेयकाला विरोध म्हणजे डाव्या विचारांना हातभार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोप : नागपूर येथे माध्यमांशी साधला संवाद

**लोकशाही वार्ता/नागपूर**

जनसुरक्षा विधेयक न वाचताच काही लोक विरोध करीत आहेत. मात्र, या माध्यमातून ते कडव्या डाव्या विचारांनाच नकळत पुढे नेत आहेत, त्यांना सहकार्य करीत आहेत, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केला.



नागपूर येथे माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जनसुरक्षा विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाल्याचा मला आनंद आहे. या संदर्भात मोठी लोकतांत्रिक प्रक्रिया पूर्ण केली आहे. २५ लोकांची संयुक्त संसदीय चिकित्सा समिती गठीत केली. या समितीचा रिपोर्ट एकमताने आला. १२ हजार सूचना आल्या. दोन्ही सभागृहात चर्चेअंती हे विधेयक मंजूर करण्यात आले. त्यामुळे भारताचे संविधान न मानणाऱ्या, ते उलथून टाकणाऱ्या शक्तींविरोधात कारवाई करता येणार आहे.

कुठल्याही आंदोलन करण्याचा, सरकारला विरोध करण्याचा, बोलण्याचा किंवा लिहिण्याचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार या माध्यमातून काढून घेण्यात आलेला नाही. मात्र, प्रथमच कुठल्याही एका संघटनेवर कारवाई करण्यासाठी हा कायदा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधी व्यक्तीविरोधात कारवाई करावी लागत होती. यानिमित्ताने न्यायालयासारखी सर्व व्यवस्था उभी केली असून, आधी त्या मंडळापुढे पुराव्यांसह जावे लागणार आहे. त्यानंतरही संबंधित संघटनेला ३० दिवसांत उच्च न्यायालयात जाता येणार आहे. यामुळेच ज्यांनी हा कायदा वाचला नाही. त्यांनी याबाबत विरोधाची भूमिका घेतली असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, देशाच्या क्रिमिनल जस्टीस सिस्टीम संदर्भात गतिशीलता हवी याकडे लक्ष वेधत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी १०० वर्षांनंतर अनेक कायद्यात बदल केले आहेत. या बदलाचे त्यांनी स्वागत केले. यात भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष संहिता या तीन कायद्याचे आणि या माध्यमातून क्रिमिनल जस्टिस सिस्टिम बदलाचे त्यानी यावेळी स्वागत केले.

### ॲड. निकम यापुढेही देशाच्या शत्रूंविरोधात लढत राहतील

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, ॲड. उज्ज्वल निकम यांच्या राज्यसभेवर नियुक्तीचा मला अतिशय आनंद आहे. नामवंत विधिज्ञ ज्यांनी अनेक केसेस देशाच्या शत्रूविरुद्ध लढविल्या, त्यांच्या प्रयत्नातून अनेक दहशतवाद्यांना शिक्षा मिळाली. राष्ट्रपतींनी त्यांचे नाव निश्चित केले. राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. ॲड. निकम यांच्यासारख्या ज्येष्ठ विधिज्ञ व्यक्तीला राष्ट्रपतींच्या कोट्यातून राज्यसभेवर पाठवले गेले. भविष्यातही राष्ट्रभक्तीच्या भावनेतून न्यायपालिका आणि संसदेत देशाच्या शत्रू विरोधात ते लढत राहतील असा विश्वास आहे, असे ते म्हणाले.**

## ना. गडकरी यांच्याकडे आलेली निवेदने थेट अधिकाऱ्यांच्या हाती

### जनसंपर्क कार्यक्रमाला मनपा, नासुप्र, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांची उपस्थिती



**लोकशाही वार्ता/नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात रविवारी (दि. १३ जुलै) नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. ना. गडकरी यांनी आलेली निवेदने थेट संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपवत समस्या सोडविण्याचे निर्देश दिलेत. बहुतांश प्रकरणात वेळीच निकाल लावण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

खामला येथील जनसंपर्क कार्यालयात ना. गडकरी यांना विविध समस्या, अडचणी तसेच मागण्यांशी संबंधित निवेदने लोकांनी दिली. यातील बहुतांश विषय नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी कार्यालय आदींशी संबंधित होते. यंदाच्या जनसंपर्क कार्यक्रमाला या सर्व कार्यालयांशी संबंधित प्रतिनिधींना हजर राहण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, उपजिल्हाधिकारी (सेतू), समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, भूमिअभिलेख, महानगरपालिका, नासुप्र, सीआरसी सेंटर येथील अधिकारी उपस्थित होते.

### कर्करोग पीडित महिलेने व्यक्त केली कृतज्ञता

**कर्करोगाच्या उपचारासाठी सहकार्य केल्याबद्दल एका महिलेने ना. गडकरी यांचे आभार मानले. मी गेल्या काही वर्षांपासून कर्करोगासारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त आहे. माझ्या कुटुंबाची आर्थिक स्थिती खालावली आहे. माझ्या उपचाराकरिता लागणारे औषध अत्यंत महाग आहे. आपल्याला संपर्क साधला असता तातडीने मदत मिळाली. त्याबद्दल मनःपूर्वक आभारी आहे, या शब्दांत महिलेने पत्राद्वारे कृतज्ञता व्यक्त केली.**

## तीन आरोपींकडून चोरीच्या दुचाकी जप्त

**नागपूर :** दुचाकी चोरी प्रकरणात गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ३ च्या पोलिसांनी ३ आरोपींना ताब्यात घेऊन २ दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले. राकेश नरेश झोडापे, पिल्लू काशीनाथ शाहू आणि आकाश ऊर्फ गोगा विजय वर्मा अशी तिघा आरोपींची नावे आहेत. कळमना हद्दीच्या चिखलीतील शिव मंदिरजवळ राहणारे नरेश श्यामचंद गोंडाणे (३३) यांनी २८ जून रोजी त्यांची एमएच ४९/ एए ६३६६ क्रमांकाची दुचाकी घरासमोर लॉक करून ठेवली होती. २९ जून रोजी सकाळी ५ वाजता त्यांना ती ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. त्यांनी दुचाकी चोरीची तक्रार नोंदविली. गुन्हे शाखा युनिट क्रमांक ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या माहितीवरून आरोपी राकेश नरेश झोडापे (२९, रा. बारसेनगर), पिल्लू काशीनाथ शाहू (३५, रा. आदिवासी प्रकाशनगर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची कसून विचारपूस केली असता दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीजवळून गुन्ह्यातील दुचाकी जप्त केली. तसेच पेट्रोलिंगदरम्यान आरोपी आकाश ऊर्फ गोगा विजय वर्मा (३५, रा. प्रेमनगर) याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने शांतीनगर हद्दीतून अंदाजे ६० हजारांची पॅशन प्रो गाडी दुचाकी चोरल्याची कबुली दिली. गुन्हे शाखा युनिट क्रमांक ३ च्या पोलिसांनी ३ आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींना पुढील कारवाईसाठी मुद्देमालासह कळमना पोलिसांच्या ताब्यात दिले.

## तीन महिन्यानंतरही सुरू झाली नाही जयपूर, नोएडा विमानसेवा

**नागपूर :** वेळापत्रक लागू होऊन तीन महिने उलटले आहेत. परंतु नागपूरहून जयपूर, नोएडा या विमानसेवा अद्याप सुरू झालेल्या नाहीत. गेल्यावर्षी इंडिगोने नागपूरहून नांदेडला विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली होती, पण तीही सुरू झालेली नाही. यावर्षी उन्हाळी वेळापत्रकात नागपूरला तीन नवीन विमानसेवांची भेट मिळणार होती. यामध्ये नागपूर आणि विदर्भातील प्रवाशांना जयपूर आणि नोएडासारख्या महत्त्वाच्या शहरांशी कनेक्टिव्हिटीचा लाभ मिळणार होता. इंडिगोने ३० एप्रिलपासून ६४१६ क्रमांकाची फ्लाइट आणि ३० मार्चपासून नोएडा-नागपूरसाठी फ्लाइट क्रमांक २५१८ सुरू करण्याची घोषणा केली होती. प्राप्त माहितीनुसार इंडिगोला जयपूर उड्डाण सुरू करण्यासाठी डीजीसीएकडून परवानगी मिळाली आहे. परंतु कंपनीकडे विमान नसल्यामुळे ही सेवा आतापर्यंत सुरू होऊ शकली नाही.

## व्हॅनच्या धडकेत चिमुरड्याचा मृत्यू

**तालुका वार्ताहर /उमरेड**



वडेगाव-वेलसाखरा रस्त्यावर मित्रांसोबत खेळत असलेल्या एका नऊ वर्षीय चिमुकल्याचा ओमनी व्हॅनच्या धडकेत मृत्यू झाला. ही घटना रविवार, १३ जुलै रोजी सकाळी १०.५० च्या दरम्यान घडली. शिवम अण्णाजी आत्राम असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वडेगाव येथील चार ते पाच मुले बंगल्यासमोर खेळत होते. खेळता-खेळता शिवम आत्राम नावाचा मुलगा रोडच्या पलीकडे जात असताना बोरगाव गावाकडून येत असलेल्या ओमनी व्हॅनच्या चालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून मुलाला धडक मारली. धडक इतकी जबरदस्त होती की चिमुरड्याचा जागीच अंत झाला. अपघातानंतर व्हॅनचालक वेलसाखरा फाटाकडे पसार झाला. जखमी मुलाला त्याच्या आई-वडिलांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात उमरेड येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. अण्णाजी आत्राम हे नागभीड तालुक्यातील खडकी येथील रहिवासी असून, शिवम हा वडेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत दुसऱ्या वर्गात शिक्षण घेत असल्याचे कळते.

## दरोड्यापूर्वीच पोलिसांनी उधळला डाव

**नागपूर :** दरोड्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या दरोडेखोरांचा पोलिसांनी डाव उधळला. दरोड्यापूर्वीच पोलिसांनी पाच आरोपींच्या मुसक्या बांधल्या. विशेष म्हणजे आरोपींमध्ये चार विधिसंघर्षग्रस्त बालकांचा समावेश आहे. तर एक आरोपी हा पळून गेला. माहितीनुसार, जरीपटका पोलिसांचे पथक गस्त घालत असताना बुधवारी रात्री खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी बेझनबाग ग्राउंड, टाटा पालक मंदिर हॉलजवळ घेराव टाकून दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना ताब्यात घेतले. यातील एक आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. तर पोलिसांनी आरोपी समीर निशांत गायकवाड (१९, खिश्चन कॉलनी, लुंबिनीनगर) याच्यासह अन्य चार विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. आरोपींच्या ताब्यातून १ लोखंडी तलवार, एक लोखंडी चाकू, मिरची पावडर, टॉर्च असा मुद्देमाल जप्त केला. सर्व आरोपींना ठाण्यात आणून त्यांच्याविरुद्ध कलम ३१०(४) भान्यासं, सहकलम ४/२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.को. अन्वये गुन्हा दाखल करीत एकाला अटक केली.



श्रावणाला सुरुवात झाली की सण-उत्सवांची रेलचेल सुरू होते. श्रीकृष्ण जन्माष्टमी श्रावणमासातील महत्त्वपूर्ण सण. शहरातील चितारओळीसह अन्यत्र वास्तव्यास असणारे कुंभार बांधव, मूर्तिकार नटखट श्रीकृष्णाच्या अर्थात कान्होबाच्या मूर्ती घडविण्याचे काम करीत आहे. दीड दिवसांचा पाहुणा म्हणून भगवान श्रीकृष्ण भक्तांच्या घरी विराजमान होतो. दीड दिवसांत त्याची मनोभावे पूजाअर्चा केली जाते. श्रीकृष्णाचे बालपण, यशोदा माता, कालियामर्दन आदींसह श्रीकृष्णाच्या लीला सांगितल्या जातात. (लोकशाही वार्ता छायाचित्रसेवा)

## परमिट रूम चालकांचे आज आंदोलन

### बार, रेस्टॉरंट, वाईन शॉप बंद : जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

कोट्यवधींचा महसूल देऊनही सरकार अन्यायकारक धोरण राबवित असल्यामुळे विदर्भातील सर्व बार आणि रेस्टॉरंट तसेच वाईन शॉप १४ जुलैला बंद ठेवण्यात येणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. तसेच आंदोलनाची दखल घेतली गेली नाही तर पुढे आम्ही बार-परमिट रूम बंद केले जातील, असा इशारा नागपूर जिल्हा रेस्टॉरंट परमिट रूम असोसिएशनने दिला आहे.

प्रारंभी परमिट रूमवर ५ टक्के सरचार्ज लावल्यानंतर त्याचे रूपांतर वॅटमध्ये करून तो १० टक्के करण्यात आला. परवाना नूतनीकरणासाठी १५ टक्के फी वाढ करण्यात आली. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या प्रारंभी १० लाख, ३६ हजार ८०० रुपये सरकारकडे जमा करावे लागते. आता सरकारने एक्साईज ड्यूटीमध्ये १५० टक्के वाढ केल्याने परमिट रूमचालकांचे कंबरडे मोडले आहे. सरकारने वॅट, नूतनीकरण फी तसेच वाढविलेली एक्साईज ड्यूटी कमी करावी, या मागणीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना वारंवार भेटून निवेदने दिली. प्रत्येक वेळी त्यांनी होकार दिला. मात्र, अंमलबजावणी झाली नाही.

एका परमिट रूममध्ये किमान १५ व्यक्ती काम करतात. महाराष्ट्रात २१ हजार परमिट रूम आहेत. अर्थात आम्ही ३ लाखांवर व्यक्तींना रोजगार दिला आहे. आम्ही सरकारला कोट्यवधींचा महसूल देतानाच बेरोजगारांना कामही देतो. मात्र, भरमसाठ करवाढीमुळे अनेक जण परमिटरूम बंद करण्यास मजबूर झाले आहे. त्यामुळे १४ जुलैला एकदिवसीय आंदोलन करून संविधान चौकातून मोर्चा काढून सरकारचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न करणार आहोत, असे असोसिएशनचे अध्यक्ष राजीव जयस्वाल, प्रशांत अहिरकर, नवीन बावणकर, रवींद्रसिंग भामरा यांनी सांगितले.

यावेळी अरुण दांडेकर, संजय धनराजानी, प्रिया वैरागडे, हेमंत पाली, हरविंदरसिंग मुल्ला, चंद्रकांत भागचंदानी, महेश मंघाणी, प्रवीण जयस्वाल आदींनी सांगितले.

## यशोधरानगरात अडीच लाखांची घरफोडी

**नागपूर :** तीन दिवसांसाठी सासूरवाडीत गेलेल्या महिलेच्या घरातून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा २ लाख ४८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी यशोधरानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्वभारती ले-आऊट येथे राहणाऱ्या दीपा रमेश बोधकर (६०) या ९ जुलै रोजी घराला कुलूप लावून मुलासह त्यांच्या सासूरवाडीत जरीपटका येथे गेल्या होत्या. ११ जुलै रोजी रात्री त्या परत आल्या असता त्यांना घरी चोरी झाल्याचे लक्षात आले. अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून बेडरूममधील आलमारीतून रोख ९५ हजार रुपये रोख तसेच सोन्या-चांदीचे दागिने असा २ लाख ४८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

## ज्वेलर्स मालकाला नऊ लाखांचा गंडा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

कमी दरात लवकरात लवकर सोन्याचे दागिने बनवून देण्याचे आश्वासन देत एका ज्वेलर्स मालकाची ९ लाखांनी फसवणूक करण्यात आली. चंद्रकांत प्रकाश भरणे (४४, रा. ओक रेसिडेन्सी, सूर्यनगर, कळमना) यांचे इतवारीतील भाजीमंडी येथे बँगल्स ॲण्ड ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. भरणे यांची ओळख रत्नकार कॉम्प्लेक्समधील दुकान नं. ७ येथील खाटूश्याम ज्वेलर्समध्ये दागिने घडविणारा पापूल अधिर खान (३७, रा. नागपूर) यांच्यासोबत झाली. त्याने भरणे यांना कमी दरात लवकरात लवकर सोन्याचे दागिने बनवून देण्याचे आश्वासन दिले. ५ एप्रिलला भरणे यांनी त्यांच्याजवळील ग्राहकांचे ९ लाख १० हजारांचे ९८ ग्रॅमचे काही जुने सोने व दागिने त्याला नवीन दागिने बनविण्याकरिता दिले. आरोपीने १५ दिवसांत बनवून देतो असे सांगितले. मात्र, दिलेच नाही. उलट त्या दागिन्यांचा स्वतःकरिता वापर करून भरणे यांची फसवणूक केली. याप्रकरणी तहसील पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# न्यायसहायक प्रयोगशाळांच्या बळकटीकरणाला प्राधान्य

### ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा करणार अवलंब - मुख्यमंत्री : न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करून न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी सकाळी झाले. याप्रसंगी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी व संजय



मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्ह्यांची सिद्धता होऊन गुन्हेगारास शासन व पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्त्वाची ठरते. नवीन भारतीय फौजदारी कायद्यांनी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे तसेच विवक्षित गुन्ह्यांमध्येही यास अनिवार्यता प्राप्त झाली आहे. तत्पूर्वी, गृह विभागांतर्गत नव्याने कार्यन्वित झालेल्या प्रयोगशाळा संगणकीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याचे, मुंबई येथील सेमी ॲटोमेटेड सिस्टीमचे आणि पुणे येथील सेंटर ऑफ एक्सलन्सचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण झाले. डॉ. विजय ठाकरे यांनी प्रास्ताविक केले. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपूरचे उपसंचालक अश्विन गेडाम यांनी आभार मानले.

### गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न

**राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले. वैविध्यपूर्ण पद्धतीचा अवलंब, तांत्रिक पुरावे आणि न्यायसहायक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला. १४ शासन निर्णय काढून गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरून ५४ टक्क्यांवर आणण्यात आले. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करताना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांच्या पुढे घेऊन जावे लागेल. राज्यात आधुनिक सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारून त्याचे महामंडळात रूपांतर करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

### २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण करा

**नागपूर येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. या प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन ही एक समाधानाची बाब असून फेब्रुवारी २०२७ पर्यंत या इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या कामांमध्ये लोकाभिमुखता व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामुळे वेळेत गुन्ह्यांची सिद्धता होऊन न्यायदानास गती येईल. न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था हे एक लोकसेवेचे कार्य असून या वर्षाअखेर प्रलंबित असलेले सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.**

## १ लाख ६७ हजारांचे एमडी पावडर जप्त

**नागपूर :** एका महिंद्रा कारच्या चालकाजवळून पोलिसांनी १ लाख ६७ हजारांचे १६.०७ ग्रॅम एमडी पावडर जप्त केले. पोलिसांनी त्याला अटक करून त्याचा सहकाऱ्याचा शोध सुरू केला आहे. संकेत अजय बुग्गेवार असे अटकेतील तर प्रणय बाजारे असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे. गणेशपेठ पोलिसांनी १३ जुलैला पहाटे मध्यवर्ती बसस्थानकासमोरील हेडाऊ भोजनालयाजवळ सापळा रचला. एमएच ४५/ एव्ही ४५५४ क्रमांकाची काळ्या रंगाची महिंद्रा कार येताच तिला थांबविले. चालक संकेत अजय बुग्गेवार (२९, रा. आशीर्वादनगर, एनआयटी मार्केटजवळ) याची अंगझडती घेतली असता पॅण्टच्या खिशात ४ झिपलॉक पन्नीमध्ये १ लाख ६७ हजारांचे १६.०७ ग्रॅम एमडी पावडर सापडले. पोलिसांनी आरोपीजवळून एमडी पावडर, मोबाईल, व थार असा १८ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीची चौकशी केली असता त्याने ते एमडी पावडर आरोपी प्रणय बाजारे (२५, रा. आशिर्वादनगर, एनआयटी मार्केटजवळ) याने दिल्याचे सांगितले.

## दृष्टिक्षेप

### तीन दुचाकींसह अट्टल वाहनचोराला अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**

प्रतापनगर परिसरातील वसाहतीमधून दुचाकी चोरणाऱ्या अट्टल चोरट्याला पोलिसांनी सापळा रचून अटक केली. चोरट्याकडून ३ दुचाकी जप्त केल्या आहेत. स्पंदन राहुल गणीवर असे या अट्टल वाहनचोराचे नाव आहे. करीम ले-आऊट परिसरातील रहिवासी कुणाल उमाठे यांनी २७ जूनला रात्री त्यांची एम. एच. ३१/ एफ.एम. ७२६४ क्रमांकाची दुचाकी घराच्या खाली लावली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर जाण्यासाठी ते पार्किंगमध्ये आले असता त्यांना दुचाकी दिसली नाही. त्यांनी प्रतापनगर पोलिस ठाण्यात वाहन चोरीची तक्रार दिली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे त्रिमूर्तीनगरातील एनआयटी हाउसिंग सोसायटीतील स्पंदन गणीवर याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने तीन दुचाकी चोरल्याचे कबूल केले. पोलिसांनी त्याच्याकडून उमाठे यांच्या दुचाकीसह एक हिरो होंडा आणि ॲक्टिव्हा अशा तीन दुचाकी जप्त केल्या. पोलिसांनी गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली.

### वॉर्डन क्वॉर्टरला, घरी दोन लाखांची घरफोडी

**लोकशाही वार्ता/नागपूर**

डागा हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या वॉर्डनला क्वॉर्टर मिळाले होते. त्यामुळे त्या अजनीतील घरी आठवड्याला येणे-जाणे करीत होत्या. दरम्यान, त्या क्वॉर्टर येथे असताना चोरट्यांनी त्यांच्या अजनीतील घरी चोरी करून २ लाख १३ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. अजनी हद्दीतील बजरंग नगरच्या गल्ली नं. १ येथे राहणाऱ्या वर्षा सुरेंद्र चाचरकर (५५) या डागा हॉस्पिटल येथे वॉर्डन आहेत. त्या येथील क्वॉर्टरमध्येही राहतात व राहत्या घरी दर आठवड्याला येणेजाणे करतात. ६ जुलैच्या ७.३० वाजता त्या घराला कुलूप लावून आईवडीलांसह क्वॉर्टरमध्ये राहण्यास गेल्या. दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या अजनी येथील घराच्या दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून बेडरूममधील लोखंडी कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने असा २ लाख १३ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. ११ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता त्या घरी परत आल्या असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अजनी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

### साडेतीन लाखांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पान मसाला जप्त

**लोकशाही वार्ता/नागपूर**

वाडी पोलिसांनी एका महिंद्रा मॅक्सिमो वाहनाला थांबवून त्याच्यातील वेगवेगळ्या कंपनीचा सुगंधित तंबाखू, पान मसाला व फ्लेवरचे तंबाखू पाऊच असा ३ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी वाहनचालकाला अटक केली असून ज्या व्यक्तीचा मुद्देमाल आहे त्याचा शोध सुरू केला आहे. वाडी पोलिस ११ जुलै रोजी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास पेट्रोलिंग करीत होते. खडगाव रोडवरील आराको गोडाऊनजवळ सापळा लावून एमएच ४०/ वाय २३०३ क्रमांकाच्या महिंद्रा मॅक्सिमो वाहनाला थांबविले. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता आत शासनाने प्रतिबंधित केलेला वेगवेगळ्या कंपनीचा सुगंधीत तंबाखू, पान मसाला व फ्लेवरचे तंबाखू पाऊच आढळले. त्यात विमल, राजश्री, रजनीगंधा पान मसाला, रिमझिम, व्हीवन, डबल ब्लॅक इत्यादी सुगंधित तंबाखूचे पाकीट सापडले. पोलिसांनी वाहन चालक अब्दुल गफ्फार अब्दुल जब्बार शेख (५०, रा, कोहळे ले-आउट, दत्तवाडी) याला मुद्देमालाबद्दल विचारले असता त्याने हा माल आरोपी सुमीत परियानी (रा. खामला) याचा असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याजवळून ३ लाख ५३ हजारांचा प्रतिबंधित तंबाखू, पानमसाला, वाहन १ लाख ५० हजार रुपये असा एकूण ५ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

### तडीपार गुंडाला शस्त्रासह अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**

शहर तसेच ग्रामीण भागातून तडीपार असताना शस्त्रासह शहरात वावरणाऱ्या गुंडाला पोलिसांनी अटक केली. अब्दुल सादिक ऊर्फ काल्या वल्द अब्दुल नासिर (२०, ख्वाजा गरीब नवाज मशिदीजवळ, ताजनगर, मानकापूर) असे या गुंडाचे नाव आहे. पोलिसांचे पथक गस्तीवर असताना गुरुवारी पहाटेपूर्वी त्यांना ताजनगर रेल्वे रुळाजवळील उड्डाणपुलाखाली आरोपी हा संशयितरित्या दिसला. पोलिसांनी त्याला हटकले असता तो पळू लागला. पोलिसांनी पाठलाग करीत त्याला ताब्यात घेतले. अंगझडतीत त्याच्याजवळ कमरेत एक लोखंडी चाकू सापडला. चाकूसह आरोपीला ताब्यात घेऊन ठाण्यात आणले. पोलिसांनी आरोपीचा अभिलेख तपासला असता परिमंडळ क्रमांक २ च्या पोलिस उपायुक्तांनी १६ जानेवारी २०२५ रोजी आरोपीला नागपूर शहर तसेच ग्रामीण भागातून एका वर्षाकरिता हद्दपार केल्याचे समजले. आरोपी हा तडीपार असताना विनापरवाना शहरात प्राणघातक शस्त्रासह वावरत होता. शिवाय तो कुठलातरी गंभीर गुन्हा घडविण्याच्या तयारीत असल्याने मानकापूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ४/२५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा करीत त्याला अटक केली.

### बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे वृक्षारोपण

**लोकशाही वार्ता/नागपूर**

बँक ऑफ महाराष्ट्र रिटायरिज असोसिएशन व कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमेन्स, सुकळी (हिंगणा नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. असोसिएशनच्या वतीने वड, पिंपळ, नारळ, फणस असे विविध प्रकारचे वृक्षारोपण करण्यात आले. आपण सर्व पर्यावरणाच्या अनिश्चिततेचा अनुभव घेत आहोत कधी अवकाळी पाऊस तर कधी तीव्र उन्हाळा पुढील काळात हे टाळण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे गरजेचे आहे, असे मत असोसिएशनचे महासचिव स्वयंप्रकाश तिवारी यांनी व्यक्त केले. तर 'कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमेन्स'चे प्राचार्य डॉ. मिलिंद खानापूरकर यांनी पर्यावरणाचा समतोल व निसर्गाचे सौंदर्य वाढविण्याकरिता झाडे लावण्याशिवाय पर्याय नसल्याचे नमूद केले. यावेळी वसतिगृह निरीक्षक कविता पाठक, व्यवस्थापन परिषद सदस्य हेमंत अंबासेलकर, श्रीकांत गाडगे, मकरंद करकरे, असोसिएशनचे महासचिव स्वयंप्रकाश तिवारी, उपाध्यक्ष भास्कर राव, आदिनाथ शामकुमार, रत्नाकर यमनुकरवार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# दहाही झोनमधील घाटांची स्वच्छता

## ७८.३ टन कचरा संकलित : 'स्वच्छता अपनाओ, बीमारी भगाओ' अभियान




**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर, स्वस्थ आणि हरित स्वरूप देण्याच्या दिशेने पाऊल टाकत नागपूर महानगरपालिका व नागपूर स्मार्ट सिटीद्वारा 'स्वच्छता अपनाओ, बीमारी भगाओ' अभियानांतर्गत शनिवारी शहरातील दहाही झोननिहाय घाट आणि परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली. यात एकूण ७८.३ टन कचरा संकलित करण्यात आला. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखीत मनपाच्या दहाही झोन अंतर्गत सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

वसुमना पंत यांनी सतरंजीपुरा झोन अंतर्गत येणाऱ्या शांतीनगर घाट आणि परिसरातून स्वच्छता मोहिमेची सुरुवात केली. त्यांनी स्वतः गंगाबाई घाट, मोक्षधाम घाट आणि अंबाझरी घाट यांच्यासह विविध परिसराला भेट देत मोहिमेची पाहणी केली. या मोहिमेअंतर्गत झोनमधील घाटातील साफसफाई, गवत कापणी, डेब्रिज उचलणे आणि संपूर्ण सखोल स्वच्छता करण्यात आली.

लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या सहकारनगर घाट परिसर, धरमपेठ झोन अंतर्गत येणाऱ्या अंबाझरी घाट परिसर, हनुमाननगर झोन अंतर्गत येणाऱ्या मानेवाडा घाट परिसर, धंतोली झोन अंतर्गत येणाऱ्या मोक्षधाम घाट परिसर, नेहरूनगर झोन अंतर्गत येणाऱ्या दिघोरी घाट, भांडेवाडी प्राणी निवारा परिसर, गांधीबाग झोन अंतर्गत येणाऱ्या गंगाबाई घाट परिसर, सतरंजीपुरा झोन अंतर्गत येणाऱ्या शांतीनगर घाट परिसर, लकडगंज झोन अंतर्गत येणाऱ्या पारडी घाट परिसर, आशीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या वैशालीनगर घाट परिसर, मंगळवारी झोन अंतर्गत येणाऱ्या मानकापूर घाट, महेशनगर परिसर येथे सखोल स्वच्छता करण्यात आली.

**मोहिमेसाठी आरआरआर केंद्राच्या वाहनासह ६ जेसीबी, १० टिप्पर, ३२ लहान-मोठ्या गाड्या, सर्व कचरा संकलन वाहने तैनात करण्यात आल्या होत्या. स्वच्छता मोहिमेतून लक्ष्मीनगर झोनमधून १.५ टन, धरमपेठ झोनमधून १.५ टन, हनुमाननगर झोनमधून झोन २.० टन, धंतोली झोनमधून २.० टन, नेहरूनगर झोनमधून २.० टन, गांधीबाग झोनमधून ११.० टन, सतरंजीपुरा झोनमधून २०.० टन, लकडगंज झोनमधून ५.० टन, आशीनगर झोनमधून २८.० टन, मंगळवारी झोनमधून ४.३ टन असा एकूण ७३.३ टन कचरा संकलित करण्यात आला.**

**शहरातील झोननुसार घाट आणि परिसरात राबविण्यात आलेल्या या सखोल स्वच्छता मोहिमेत शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांनी स्वयम स्फूर्ततेने सहभाग घेतला. तेजस्विनी महिला मंच मंचच्या किरण मुंदडा यांच्यासह ग्रीन व्हिजील फाउंडेशन यांचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. यावेळी ग्रीन व्हिजिलचे स्वयंसेवक, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसूरकर, शीतल चौधरी, विष्णुदेव यादव, श्रीया जोगे त्यांनी परिसराची स्वच्छता केली.**

## कुशीनारा बुद्ध विहारात वर्षावास प्रारंभ



**लोकशाही वार्ता/नागपूर**

न्यू कैलासनगर येथील कुशीनारा बुद्ध विहाराचे संचालक डॉ.भदंत धम्मोदय महाथेरो यांनी आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा पर्यंत 'वर्षावास' सुरू केला आहे. भंते धम्मोदय हे मागील १४ वर्षापासून न्यू कैलासनगर येथील कुशीनारा बुद्ध विहारात बुद्ध विहार समिती, महिला मंडळ, त्रिरत्न धम्मोराईज मिशन, तथागत धम्म प्रचार संघ, कुशीनारा बुद्ध विहार चारिटेबल ट्रस्ट आदींच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य नियमितपणे करीत असतात.

अखिल भारतीय भिक्खू संघाचे विदर्भप्रांत अध्यक्ष भंते प्रियदर्शी महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात 'वर्षावास' पर्व प्रारंभ करण्यात आले आहे. तथागत बुद्धाच्या धम्मात वर्षावासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले असून, भिक्षू संघ तीन महिने (पावसाळा) एका ठिकाणी राहून दररोज समाजाचे प्रबोधन करीत असतो. त्यामुळे भिक्खूंच्या व नागरिकांच्या जीवनात वर्षावासाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे भंते प्रियदर्शी यांनी सांगितले. कुशिनारा बुद्ध विहारात दररोज सायंकाळी सहा ते सातच्या दरम्यान भंते डॉ. धम्मोदय हे परितदेशना व ध्यान भावनेवर तीन महिने मार्गदर्शन करतील. 'वर्षावास' प्रारंभ कार्यक्रमाला भंते प्रियदर्शी, भन्ते डॉ. धम्मोदय, भंते शोबिडा-त्रिपुरा, भंते विनयकीर्ती, भंते सुमंगल, भंते तिस्स, भिक्षुणी आम्रपाली आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुशिनारा बुद्ध विहार चारिटेबल ट्रस्टचे उत्तम शेवडे ह्यांनी केले. कुशिनारा बुद्ध विहार समितीचे रमेश पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी परिसरातील उपासक उपासिका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमा दिवस उत्साहात साजरा




**लोकशाही वार्ता/नागपूर**

उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेज, श्री साई ताज पॉलिटेक्निक व पार्श्वनाथ पब्लिक स्कूल, द्रुगधामणा वाडी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध डॉ. मधुकर पर्चन्ट, उदय टेकाडे, प्राचार्या डॉ. रश्मी माहुलकर, डॉ. सुप्रिया तांबे, प्रा. राहुल बावणे उपस्थित होते. यावेळी उदय टेकाडे म्हणाले गुरुपौर्णिमेचा सण भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये हिंदू, जैन आणि बौद्ध धर्मियांद्वारे साजरा केला जातो. डॉ. मधुकर पर्चन्ट म्हणाले, गुरूंच्या स्मरणाचा दिवस म्हणून हा दिवस पवित्र मानला जातो.

याचबरोबर महर्षी व्यासांचे या दिवशी विशेष महत्त्व आहे. त्यांनी वेदांचे वर्गीकरण, महाभारताचे लेखन आणि अनेक पुराणांचे संकलन केले. गुरू हा वैयक्तिक शिक्षक देखील असू शकतो. बुद्धाला लोकागारू म्हणतात, याचा अर्थ 'जगाचा शिक्षक' असा आहे.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन शर्वरी माकोडे, साक्षी मदनकर व सुहानी लोणकर या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन साक्षी मदनकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी व विद्यार्थी हिमांशी ढोले, प्रियदर्शनी गोरे, रिया कोहळे, परिणिती अंबोरे, प्रणय खैरे, सत्यम मदने, श्रुतीका वानखडे, तनुश्री गटकिने, ओंकार मडावी, श्रेयश सोनोले, ध्रुव छांगाणी, गरिष्मा लोणारे यांनी परिश्रम घेतले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त ५१ गुरुजणांचा सन्मान

**लोकशाही वार्ता/नागपूर**

भारतीय जनता पार्टी नागपूर महानगरद्वारे गुरुपौर्णिमा पर्वानिमित्त ५१ गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रात गुरू शिष्य परंपरा चालविणाऱ्या ५० हून अधिक आध्यात्मिक, सांस्कृतिक, संगीत, क्रीडा, आखाडा आणि नाट्यक्षेत्रातील गुरूंचा सन्मान भाजपा नागपूर महानगरचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांचे मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

आध्यात्मिक क्षेत्रात महेश गिरी महाराज-तेलंगखेडी, हरी भक्त परायण श्रीरामपंत जोशी महाराज, कांबळे महाराज, कबीर मठाचे महंत मुनीरदास महाराज, तसेच पौरोहित्य क्षेत्रात वेदमूर्ती कृष्णशास्त्री आर्वीकर, वेदमूर्ती धामणकर, प्रफुल्ल नंदनगिरी, गंगाधर पोडल्लीवार, अयाचित मंदिराचे संचालक रामाजी अयाचित, अहिल्या देवी मंदिराच्या माई खांडेकर, संत परंपरा मध्ये परमात्मा एक मंडळ बाबा जूमदेव उत्सव टिमकीचे सदस्य, गुरुदेव सेवा मंडळ- सुभाष रोड संचालक अशोक यावले, संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध ज्येष्ठ पार्श्वगायक रघुनाथ बोबडे, ज्येष्ठ संगीतकार श्याम देशपांडे, नाट्य क्षेत्रातील ज्येष्ठ रंगकर्मी मुकुल खोत, मीना देशपांडे, वैद्यकीय क्षेत्रात ज्येष्ठ होमिओ तज्ज्ञ डॉ. राजेश मुरकुटे, क्रीडा विभागात भारत व्यायाम शाळेचे चंद्रकांत जाधव, राजू क्षीरसागर, आदी गुरुजनांचा भाजपच्या मंडळ अध्यक्ष, नगरसेवक व पदाधिकारी यांनी त्यांच्या गुरूस्थानात जाऊन शाल श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सन्मान केला.

अनेक ठिकाणी भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी स्वतः वैयक्तिक जाऊन सन्मान केला. यावेळी माजी संघटन मंत्री विष्णू चांगदे, बंटी कुकडे, महामंत्री अश्विनी जिचकार उपस्थित होत्या. या गुरुपौर्णिमा उत्सव समितीचे नियोजन आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष डॉ. श्रीरंग वराडपांडे यांचे होते. कार्यक्रमासाठी अनिल मानापुरे, श्याम चांदेकर, ईश्वर ढेंगळे, विनोद बघेल, विनय दाणी, ईश्वर ढेंगळे, अमित पांडे, ओमप्रकाश इंगळे, राजेंद्र गोतमारे, अमर खोडे, शशांक खेकरे, किरण दातीर, प्रकाश यादव, महेंद्र भुगावकर, राजेश ठाकूर, प्रदीप पोहणे, संजय चौधरी, शेषराव गोटमारे, विनोद शिंदे, दिलीप दिवे, संजय बालपांडे आदी मंडळ अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## मार्गदर्शक दीपस्तंभांची समाजाला गरज - डॉ. परिहार

### साहित्य भारतीचा 'गुरूवंदन' सोहळा साजरा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

आपल्या भारत देशात महर्षी वेदव्यासांपासून आदी शंकराचार्यांपर्यंत सर्व ऋषीमुनींनी संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करण्याचे कार्य केले. वेदवाङ्मय, पुराणे आणि उपनिषदांच्या निर्मितीचा प्रारंभ आषाढ पौर्णिमेला झाला. त्यामुळे आषाढ पौर्णिमा हा ज्ञानारंभाचा तसेच गुरूंच्या गौरवाचा दिवस आहे. या पर्वावर साहित्य भारतीतर्फे तीन क्षेत्रांतील गुरूंचा होत असलेला गौरव हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहे, असे विचार अ.भा. साहित्य परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. श्रीराम परिहार यांनी व्यक्त केले.

साहित्य भारती विदर्भ प्रांताच्या वतीने बुधवारी हिंदी मोरभवन येथे गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला आयोजित 'गुरुवंदन' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी साहित्य क्षेत्रातील शुभांगी भडभडे, संगीतकार डॉ. नारायणराव मंगरूळकर व शिक्षक डॉ.बाबासाहेब नंदनपवार या तीन गुरूंचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विदर्भ प्रांत अध्यक्ष ॲड. लखनसिंह कटरे, कार्याध्यक्ष चंद्रकांत लाखे, सुरूची डबीर, ॲड. सुनील पाळधीकर, विनय माहूरकर उपस्थित होते. नागपूरचे भूषण असलेल्या या तिघांच्या कार्याची प्रशंसा करून डॉ. परिहार पुढे म्हणाले की, समाजाला एकसंध राखून दिशा दर्शवण्यासाठी अशा दीपस्तंभांची आज गरज आहे. अ.भा. साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय मंत्री डॉ. साधना बलवटे गौरवमूर्तींबद्दल भावना व्यक्त करीत म्हणाल्या, साहित्य, संगीत या कलांचा आणि शिक्षणातील कार्याचा गौरव करणे यात मनुष्य जीवनाची सार्थकता आहे. तिन्ही गौरवमूर्तींनी मनोगत व्यक्त करताना आपापल्या गुरूंबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी साहित्य भारतीचे विदर्भ प्रांतमंत्री सुनील शिनखेडे यांनी प्रास्ताविक केले. नागपूर शाखेचे सचिव ॲड. माधव बोबडे यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन प्राचार्य स्नेहल पाळधीकर यांनी केले. कार्यक्रमाला साहित्य भारती नागपूर शाखेचे अध्यक्ष डॉ. गणेश चव्हाण, कार्याध्यक्ष डॉ. चंद्रशेखर भुसारी, प्रकाश एदलाबादकर, उपाध्यक्ष अनिल देव, सहसचिव डॉ. स्वाती मोहरीर यांच्यासह अनेक रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भरत महाशब्दे, डॉ. पूनम मिश्र, शिरीष दामले, रामकृष्ण सहस्त्रबुद्धे इत्यादींनी परिश्रम घेतले.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठात निवडून आलेल्या उमेदवारांचा राष्ट्रवादीतर्फे सत्कार

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या विविध पदांसाठी ८ जुलै रोजी निवडणूक पार पडली. या निवडणुकीत निमा स्टुडन्ट फोरम, महाराष्ट्र राज्य व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर ३ उमेदवार निवडून आणण्यात यश आले आहे. निवडून आलेल्या उमेदवारांचा राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे सत्कार करण्यात आला.

निवडणुकीत अधिसभेवर (सिनेट) डॉ. निखिल महाजन, तर विद्यार्थी परिषद उपाध्यक्षपदी डॉ. आदर्श नलावडे, विद्यार्थी परिषद संयुक्त सचिवपदी डॉ. भूषण औसरमले यांचा विजय झाला. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी तीनही विजयी उमेदवारांना मुंबई येथे बोलवून त्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे, आ.चंद्रकांत नवघरे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . यावेळी नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे सभापती रंजन ठाकरे, वेब कन्व्हेनर- निमा डॉ.सागर कारंडे, अध्यक्ष डॉ. संकेत झाडे, सचिव डॉ.कृष्णा चालगे, कोषाध्यक्ष डॉ. योगेश उदगीकर यांचेही निवडणुकीतील यशाबद्दल कौतुक करण्यात आले.

निमा केंद्रीय शाखा व निमा महाराष्ट्र शाखेने निमा स्टुडंट फोरम महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय शाखेच्या लिस्ट मधील सर्व विद्यार्थ्यांनी निवडणुकीसाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले. निवडणूक नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन केंद्रीय अध्यक्ष डॉ.आशुतोष कुलकर्णी, माजी केंद्रीय अध्यक्ष टेंभुर्णीकर, केंद्रीय उपाध्यक्ष डॉ. शैलेश निकम, डॉ. गजानन पडघन, केंद्रीय कोषाध्यक्ष डॉ. शांतिलाल शर्मा, निमा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. राजू ताटेवार, सचिव डॉ. प्रशांत देशमुख, कोशाध्यक्ष डॉ. सोपान खर्चे तसेच निमा संघटनेचे राज्याचे डॉ. सागर कारंडे, डॉ. श्रीराम रगड, डॉ. पवन सोनवणे, डॉ. विष्णू बावणे, डॉ.देवेंद्र बचाव, निमा स्टुडंन्ट फोरम महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संकेत झाडे, सचिव डॉ. कृष्णा चालगे, कोषाध्यक्ष डॉ. योगेश उडगीकर, अमीर कोटनाळ (सोलापूर), डॉ. सदाकांत राठोड (नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# वाहतूक नियमांचे पालन केल्यास ५० टक्के अपघात होतील कमी

## राजू वाघ : '११ दिवसांत अवगत करा, रस्ते अपघातमुक्त जीवन जगण्याची कला' उपक्रम

**लोकशाही वार्ता/नागपूर**

जीवघेण्या मानवी चुकीमुळे होणाऱ्या रस्ते अपघातांवर नियंत्रण आणण्याकरिता नागपूर शहरातील प्रत्येक वाहन चालक नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. वाहतूक नियम पाळणे ही आपली जीवनशैली बनविल्यास तब्बल ५० टक्के मानवी चुकांमुळे होणाऱ्या रस्ते अपघातांवर नियंत्रण आणता येईल, असा विश्वास रोडमार्क फाउंडेशनचे प्रमुख आणि राष्ट्रीय रस्ता सुरक्षा परिषदेचे (परिवहन मंत्रालय भारत सरकार) अशासकीय सदस्य राजू वाघ यांनी व्यक्त केला.

उत्कर्ष सभागृह, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, सीताबर्डी येथे रस्ते अपघातमुक्त नागपूर अभियानाअंतर्गत '११ दिवसांत अवगत करा रस्ते अपघातमुक्त जीवन जगण्याची कला- एक लोकचळवळ'ची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला नागपूर शहर आणि ग्रामीण भागातील रस्ता सुरक्षा संस्था, सामाजिक कार्यकर्ते, संस्था संघटना, व्यापारी, ट्रान्सपोर्टर, ऑटोचालक, व्हॅन संघटना, विविध प्रकारे जनजागृती करणाऱ्या संस्था, गणेश उत्सव, दुर्गा उत्सव मंडळ, वस्ती, कॉलनी, झोपडपट्टी अशा शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत दक्ष आणि जबाबदार नागरिक उपस्थित होते. जे नागरिक स्वप्रेरणेने वाहतूक नियमांचे पालन करीत असतील त्यांचे अभिनंदन.



परंतु जे वाहन चालक नागरिक चुकून रस्ते अपघाताला कारणीभूत जीवघेण्या मानवी चूक करीत असतील त्यांना वाघ यांनी आवाहन केले की, त्यांनी त्या चुका दुरुस्त कराव्या व ११ दिवसांत रस्ते अपघातमुक्त जीवन जगण्याची कला अवगत करावी. यावेळी 'मातृशक्तीचा जागर' गाण्याचे संगीतकार मनीष उपाध्ये, प्रबोध देशपांडे, विदर्भ ज्येष्ठ नागरिक मंडळाचे बबन वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते. लोकचळवळ उभी करताना विविध उपक्रमांचे आयोजन कशा पद्धतीने करावे, यासंबंधित संकल्पना उपस्थितांनी सांगितल्या. त्यानुसार प्रत्येक सदस्यांनी आपापल्या परिसरात कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प केला.

याप्रसंगी नागनाथ स्वामी संस्था दिगांबर खूसपारे, सुशील पांडे, चंद्रकांत डेकाटे, वनिता सांगोले, बबनराव वानखेडे, डॉ. बिपीलाल मुजुमदार, नंदकिशोर चरडे, रवींद्र अहिरकर, प्रकाश जावडे, नमिता चोपकर, विनय भालेराव, दिनेश टेकाडे, बबीता धुर्वे, अनिता फुले, प्रभुदास रामटेके, नितीन वाघ, उमराव बोबडे, अमोल खापेकर, अरुण गोडबोले, सचिन लिमसे, हिरामण, डॉ. रामनिक लेंगोरे, विनोद पांडे, अखिल पवार, अमोल मिसाळ, समता रामखडे, हरीश वाडीकर, उदय करोळ, रवींद्र परांजपे, अमिलाल देशमुख, प्रथमेश सहस्त्रबुद्धे, माधवी मडके, रूपकुमार आचार्य, अनिता ज्ञानी, मंदाकिनी खामगाव, दिनेश क्षीरसागर, दीप्ती घाटोळे, वनिता मुंगेलवार, अजय शिंगारे, नितेश बडे, उज्वल खोपकर, स्नेहल खोपकर, सुरेश घाटे, माला हारोडे, निता दादुरे, विनोद मुंडे, संजय अंबाडे, थानेंद्र वनवंशी, अनिल वाघ, प्रज्ज्वल दिघेकर, अनिल चौधरी, गणेश ठाकरे, दीपा गेडाम, सागर चावके उपस्थित होते.

**PUBLIC NOTICE**

Pro. No. 4537 Dt. 23/06/25

**IN THE COURT OF 4th JOINT CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, NAGPUR. Room No. 104**

**M.J.C. Case No. 457/2025**

**Fixed For 29/07/2025**

**Applicant : 1) Nanda Wd/o Ravindra Pattiwar, 2) Prakash S/o Gulabrao Adewar. --Versus--**

**Non-Applicants:** Nil

**Name of Deceased: 1) Manorama W/o Gulabrao Adewar, Died On 19/06/2024,** R/o Plot No. 788, Trimurti Nagar, Near Dr. Choube Hospital, Nagpur.

Whereas **Manorama W/o Gulabrao Adewar, Died On 19/06/2024,** R/o Plot No. 788, Trimurti Nagar, Near Dr. Choube Hospital, Nagpur. and Whereas **Nanda Wd/o Ravindra Pattiwar & Oth.** has presented an application to this Court for grant of **Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act 1827.**

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants **Nanda Wd/o Ravindra Pattiwar & Oth.** as Legal Heir of the deceased to appear in the Court of **4th Joint Civil Judge Junior Division, Nagpur** on **29th Day of July, 2025** at 10.30 A.M. there to enter their objections and it is hereby declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate of Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the court, that **21st day of June, 2025.**

Seal — **By order of the Court Asstt. Supdt. (T.W.) Civil Judge Sr. Dn. Nagpur.**

Prasanna Publicity 09326927622

**PUBLIC NOTICE**

Pro. No. 4914 Dt. 11/07/25

**IN THE COURT OF 3rd JOINT CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, NAGPUR. Room No. 516**

**M.J.C. Case No. 487/2025**

**Fixed For 30/07/2025**

**Applicant : 1) Nikhil Kamlakar Kalkar, 2) Kamlakar Shankarrao Kalkar, 3) Smt Bhagyada wd/o Sameer Kalkar**

**--Versus-- Non-Applicants: Nil**

**Name of Deceased : 1) Sameer Kamlakar Kalkar, Died On: 30/09/2011, 2)Mangla Kamlakar Kalkar, Died On: 22/05/2016,** Both R/o C/o Kapil Deshpande, Plot No. 136/137, Parwati Nagar, Sriniwas Apartment, Tah Distt Nagpur-440027

Whereas **1) Sameer Kamlakar Kalkar, Died On: 30/09/2011, 2)Mangla Kamlakar Kalkar, Died On: 22/05/2016,** Both R/o C/o Kapil Deshpande, Plot No. 136/137, Parwati Nagar, Sriniwas Apartment, Tah Distt Nagpur-440027 and Whereas **Nikhil Kamlakar Kalkar & Oth.** has presented an application to this Court for grant of **Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act 1827.**

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants **Nikhil Kamlakar Kalkar & Oth.** as Legal Heir of the deceased to appear in the Court of **3rd Joint Civil Judge Junior Division, Nagpur** on **30th Day of July, 2025** at 10.30 A.M. there to enter their objections and it is hereby declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate of Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the court, that **10th day of July, 2025.**

Seal — **By order of the Court Asstt. Supdt. (T.W.) Civil Judge Sr. Dn. Nagpur.**

Prasanna Publicity 09326927622

दृष्टिक्षेप

## ना. आशिष जयस्वाल यांच्या प्रयत्नातून दिव्यांगास पुन्हा मिळाले हात



**शहर वार्ताहर/रामटेक**

पारशिवनी तालुक्यातील गहुहिवरा येथील रवींद्र राऊत यांचे दोन्ही हात विजेचा तीव्र शॉक बसून कोपरापासून तुटले होते. ही अत्यंत वेदनादायक घटना होती. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला आणि त्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सिंथेटिक हात (मायोइलेक्ट्रिक आर्टिफिशियल आर्म्स) प्रदान करण्यात आले. हे हात त्यांच्या खांद्यातील व हातातील उरलेल्या स्नायूंच्या हालचाली सेन्स करून कार्य करतात. हाताच्या पृष्ठभागावर लावलेल्या अत्यंत संवेदनक्षम इलेक्ट्रोड्समुळे मेंदूने दिलेले हालचालीचे संकेत हातात रूपांतरित होतात आणि त्यामुळे ते हात उचलणे, पकडणे, मोकळे करणे अशा मूलभूत हालचाली शक्य होतात. आज हे कृत्रिम हात यशस्वीपणे जोडण्यात आले. या प्रसंगी रवींद्र राऊत यांनी मंत्री जयस्वाल यांची भेट घेतली. त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबीयांचीही उपस्थिती होती. त्यांनी मनापासून आभार व्यक्त करीत ही मदत त्यांच्यासाठी नवजीवन देणारी ठरल्याचे सांगितले. दिव्यांग बांधवांचे आयुष्य अधिक सुसह्य व सन्मानपूर्वक होण्यासाठी मी केवळ रस्त्यावर नव्हे, तर विधानमंडळातही सातत्याने आवाज उठवत आलो आहे. दिव्यांग कल्याणासाठी ही लढाई सुरूच राहणार आहे, असे यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले.

## उमरेड तालुका प्रेस क्लबतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तालुका वार्ताहर/उमरेड**

व्हॉइस ऑफ इंडिया उमरेड तालुका प्रेस क्लबतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा शासकीय वसतिगृह उमरेड येथे नुकताच सत्कार घेण्यात होता. यामध्ये वर्ग दहावी महाराष्ट्र स्टेट बोर्ड व सीबीएससीइत उमरेड तालुक्यातून प्रथम, द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मानचिन्ह, प्रत्येकी १००० रुपये नगद, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला नायब तहसीलदार मनोज वाडे तर विशेष अतिथी साने गुरुजी ज्येष्ठ नागरिकचे अध्यक्ष प्रभाकर लांजेवार व उमरेड तालुका प्रेस क्लब व्हाईस ऑफ इंडियाचे अध्यक्ष रोशन पाटील, सचिव महादेव सोरते व्यासपीठावर उपस्थित होते. महाराष्ट्र स्टेट बोर्ड वर्ग दहावीत प्रावीण्य मिळविणाऱ्या मॉडल्स हायस्कूल वेकोलि उमरेड माहीन मुंतशीर कुरेशी ९९.४०% तर द्वितीय क्र. नितेश किसन आवारी ९७.८०%. सीबीएससीइ बोर्डमध्ये प्रावीण्यप्राप्त संस्कार विद्यासागरमधून प्रथम अमेया कथा पटल ९८.०८ %, स्व. देवराव इटनकर पब्लिक स्कूल उमरेड द्वितीय क्र. अवंती गुप्ता ९७.६० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोमेंटो सन्मानचिन्ह एक हजार रुपये रोख पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संचालन पांडुरंग चौधरी, आभार सतीश तुळसकर यांनी मानले.

## जि.प. शाळा इंदोरा येथे 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत वृक्षारोपण

**वार्ताहर/कोदामेंढी**

येथून जवळच असलेल्या जि.प. शाळा इंदोरा येथे बुधवारी (२ जुलै) एक पेड़ माँ के नाम या योजनेअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांकडून शाळा परिसर व शाळेसमोरील भव्य पटांगणावर सामाजिक वनीकरण नागपूर येथील विभागीय वनाधिकारी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मिश्र प्रजातीची रोपे लागवड करण्यात आली. याप्रसंगी सामाजिक वनीकरण रामटेक येथील वनपरिक्षेत्र अधिकारी जितेंद्र ढाले, वनपाल एन.एन. केंद्रे, आर.आर. शुक्ला, वनरक्षक स्वरूप केरवार, मुख्याध्यापिका बन्सोड, शिक्षक बॅनर्जी व विद्यार्थीगण उपस्थित होते.

## बहुउद्देशीय परमात्मा एक सेवक मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**शहर वार्ताहर/रामटेक**

तालुक्यातील नगरधन बहुउद्देशीय परमात्मा एक सेवक मंडळ नगरधनच्या वतीने यंदाही पावसाळी हवनकार्यनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माजी सभापती नरेंद्र बंधाटे, मार्गदर्शक श्रावण बावनकुळे व नगरधनच्या सरपंच माया अरुण दमाहे यांच्या हस्ते मंडळातील सेवकांची मुले दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबा जुमदेवजी यांचे कार्य, अंधश्रद्धा, निर्मूलन व व्यसनमुक्ती यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. संचालन राधेश्याम लिल्हारे तर प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष रमेश बिरनवार यांनी केले. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष रमेश बिरनवार, उपाध्यक्ष देविदास ठाकरे, राजू देवांगण, योगेश क्षीरसागर, राधेश्याम लिल्हारे, दत्तू दिवटेलवार, सुरेंद्र बिरनवार, श्रावण गाथे, रवींद्र वंजारी, परसराम बावनकुळे, ज्येष्ठ सेवक विठ्ठलराव येळणे, जितेंद्र सरोदे, मोहित ईखार, पो.पा. नितेश सावरकर, शकुंतला बावनकुळे, कलाबाई ईखार यांच्यासह सेवक व सेविका उपस्थित होत्या.

# मोवाड बसस्थानकाच्या आधुनिकीकरणाचा शासनाला विसर

## वर्षभरापूर्वी दिले होते निवेदन : आता आमदारांसमोर घातले साकडे

**तालुका वार्ताहर/ नरखेड**

सद्यस्थितीत जिल्ह्यात सुरू असलेल्या इतर बसस्थानकांचे आधुनिकीकरण तसेच इतरत्र प्रवासी सुविधेचे कार्य जोमात सुरू असताना अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे म्हणजेच महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेलगत, छिंदवाडा–नागपूर–अमरावती या तीन जिल्ह्याला जोडणारे नरखेड तालुक्यातील मोवाड बसस्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम मात्र, शासनाच्या डायरीत दूरपर्यंत दिसत नसल्याने येथील प्रवाशी, व्यापारी तसेच विद्यार्थी वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाविषयी कमालीचा असंतोष दिसून येत आहे.

वर्षभरापूर्वी यासंदर्भातील निवेदन संबंधिताकडे देऊनही अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासनाचा पाऊस पाडण्यात येत असल्याने आता येथील नागरिकांनी काटोलचे विद्यमान आ. चरणसिंग ठाकूर यांच्याकडे निवेदन देऊन साकडे घातले आहे. निवेदन देतेवेळी वाहतूक प्रवासी मित्र तसेच नरखेड तालुका योग शिक्षक संघाचे योग शिक्षक श्रीकांत मालधुरे, पत्रकार अनिल ढोके तसेच गंगाराम भगवान नगरपरीषद उच्च माध्यमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक सुरेश पांढरकर आदी उपस्थित होते. दरम्यान, आ. चरणसिंग ठाकूर यांनी याकामाकडे विशेष लक्ष देऊन विषय मार्गी लावण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.



मोवाड हे नगर परिषदचे शहर असून मोवाड बसस्थानकाला वाहतूक नियंत्रकाची वाणवा आहे. काटोल बसस्थानक येथे ९ जुलै रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात आला होता. यावेळी नागपूर विभाग नियंत्रक विनोद चवरे व काटोल बसस्थानक आगार व्यवस्थापक अनंत ताटर उपस्थित होती. यावेळी त्यांना विविध मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी माजी मुख्याध्यापक सुरेश पांढरकर, माजी नगरसेवक मुंकीद मोरे, अनिल ढोके, मोवाड बसस्थानक प्रवासी सदस्य श्रीकांत मालधुरे हे उपस्थित होते.

मोवाडमधील बसस्थानकाला शासनाने खूप मोठी प्रशस्त जागा दिलेली आहेत. या जागेवर बसस्थानक सभोवताल व्यापारी संकुल निर्माण करण्यात यावे व सद्यस्थित इमारतीचे आधुनिकीकरण करण्याची नितांत गरज आहे. मोवाड शहरालगत २६ गावे आहे व मोवाड बसस्थानका वरून या गावातील व इतर गावातील लोक प्रवास करतात. शैक्षणिक, व्यापारी, नोकरदार यांचे दररोज ये-जा असते याकरिता काही नवीन गाड्या सुरू कराव्या. मोवाड व आजूबाजूच्या गावातील शेतकरी हे संत्रा उत्पादक आहे.

त्यांच्यासाठी दळणवळणाची व्यवस्था असली तर नक्कीच बसस्थानकचे उत्पादन वाढेल. जलालखेडा व्हाया मोवाड सावनेर-नागपूर बससेवा वाढविण्यात यावी. शें.घाट व्हाया मोवाड, नरखेड-सावनेर-नागपूर, नागपुर व्हाया काटोल, जलालखेडा, मोवाड,सौसर, बैतुल बस सेवा सुरू करण्यात यावी.

यामुळे बैतुल पर्यटनाला चालना मिळेल व बस महामंडळाला आर्थिक लाभ होईल. वरुड व्हाया मोवाड नरखेड, सावरगाव, सावनेर बस सुरू करण्यात यावी. मोवाड पौराणिक वारसा असल्यामुळे दररोज येथे पर्यटकांची ये-जा असते. याचा नक्की आर्थिक लाभ मिळेल. कारंजा व्हाया मोवाड-नरखेड बससेवा सुरू करण्यात यावी, अशा विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## पेंडकापारचा आशीर्वाद शिकागो युनिव्हर्सिटीत चमकला

**लोकशाही वार्ता/बेला**

येथून ४ किमी अंतरावरील पेंडकापार या लहानशा खेड्यातील आशीर्वाद यशोदा गंगाधर वाकडे या युवकाने आर्थिक हलाखीवर मात करीत अमेरिकेच्या शिकागो युनिव्हर्सिटीतून 'पब्लिक पॉलिसी' या विषयात पदव्युत्तर (मास्टर्स) पदवी मिळवली. याबद्दल त्यांचे बेला व परिसरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.



अवघ्या ३५० लोकसंख्येच्या पेंडकापार खेड्यात राहणारे गंगाधर वाकडे यांच्याकडे केवळ साडेतीन एकर शेती आहे. समुद्रपूरजवळच्या वाघेडा येथील जि. प. शाळेत प्राथमिक शिक्षणाचे धडे घेतले. त्यानंतर आशीर्वादने हिंगणघाट येथील महात्मा फुले प्रागतिक विद्यालयातून दहावी व जीबीएमएम कनिष्ठ महाविद्यालयातून बारावीपर्यंत शिक्षण घेतले. पुढे पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमधून फिजिक्समध्ये बीएससी केली. २०१९-२० साली तेलंगणा सरकारच्या आश्रमशाळा विभागात सल्लागार, २०२० मध्ये अजीम प्रेमजी विद्यापीठ बंगलुरूच्या कोविड डॅशबोर्ड प्रकल्पात महाराष्ट्र राज्य प्रोजेक्ट असोसिएट म्हणून काम केले. २०२१ मध्ये निवडणूक व्यवस्थापन कंपनीत राजकीय सल्लागार म्हणून प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या प्रचारार्थ विधानसभा जागांचे व्यवस्थापन व नियोजन केले. पुढे युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो येथे 'पब्लिक पॉलिसी' या विषयात पदवीधर (मास्टर्स) पदवीसाठी प्रवेश मिळविला.

## ग्राहक संघटनेत वळवळ नको, चळवळ करा - डॉ. मेहरे

### अ.भा.ग्रा.पं.ची जिल्हा व महानगर कार्यकारिणी

**वार्ताहर/मौदा**

ग्राहक संघटनेत नुसतीच वळवळ नको, तर एक चळवळ म्हणून काम करा, असे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे यांनी केले आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निर्देशानुसार, जिल्हा व महानगर नवीन कार्यकारिणीची घोषणा बेसा, नागपूर येथील रेणुका महाविद्यालयात करण्यात आली. पश्चिम क्षेत्रीय संघटनमंत्री नितीन काकडे व डॉ. नारायण मेहरे, प्रांत सचिव चारुदत्त चौधरी, संघटनमंत्री अभय खेडकर, उपाध्यक्ष श्रीपाद भट्टलवार, सहसचिव विलास ठोसर व सदस्य डॉ. शोभा गायकवाड, अभय खेडकर यांच्यासह इतरांची उपस्थिती होते.



**जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हाध्यक्ष** : संजय साळवे उपाध्यक्ष राजेश दिवारे, मधुकर पोटे, सचिव प्रभाकर शिवणकर, सहसचिव पांडुरंग काळे, नरेश चौधरी, कोषाध्यक्ष सतीश मारवी, कार्यालय प्रमुख रमेश जोशी, महिलाप्रमुख संध्या पुनियानी, महिला सहप्रमुख शारदा आनोडे, प्रचार, प्रसिद्धीप्रमुख नामदेव आमनेरकर, पर्यावरण आयामप्रमुख प्रदीप रिंगरे, अविनाश आयटी सेलप्रमुख बागडदे, विधी आयामप्रमुखः ॲड. केतन भोस्कर, रोजगार सृजन रमेश चिंचोणे, मार्गदर्शक विलास भोस्कर व सदस्य देवेंद्र सोनटक्के, प्रकाश कोरडे, चंद्रशेखर वांढरे, ईश्वर बरबारे, घनश्याम रहाटे, अजय काठोरे, केशव पानतावणे, योगिता बैतुले नरेश उराडे, प्रकाश क्षीरसागर तसेच नागपूर महानगर कार्यकारिणीत नगराध्यक्ष शरद जिचकार, उपाध्यक्ष विजय वाडीभस्मे, सचिव : राजू पुसदेकर, सहसचिव कठारे, विनोद चरपे, कोषाध्यक्ष विभाकर नंदी, महिलाप्रमुख : अंजू घोलावे, सहप्रमुख संध्या कुरवे, रोजगार सृजनप्रमुख : प्रा. राम शेगळे, विधी आयामप्रमुख : ॲड. प्रियेश आंगेकर व सदस्य जयश्री लोहकरे, रवींद्र जीभकाटे, अरुण काटे, डॉ. सुनील साठोणे, सुरेंद्र धोटे, संजय चिंचमलातपुरे, जयश्री लोहकरे आदींचा समावेश आहे. प्रास्ताविक विलास ठोसर, संचालन राजेंद्र दिवारे तर आभार संजय साळवे यांनी मानले.

## उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे डायलेसिस सेंटरचे उद्घाटन

**शहर वार्ताहर/रामटेक**

उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे डायलेसिस सेंटरचे उद्घाटन राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या हस्ते हस्ते करण्यात आले. सदर डायलेसिस सेंटर शासनाच्या वतीने एचएलएल कंपनीमार्फत मोफत रुग्णसेवा देणार आहे. डायलेसिस सेंटरमध्ये एकूण ७ मशिन कार्यान्वित करण्यात आलेल्या असुन तालुक्यातील किडणी आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना डायलेसिसची सेवा मोफत पुरविण्यात येणार आहे. रुग्णांना आता डायलेसिस करीता नागपूर तसेच इतर खासगी रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही. रुग्णांना तालुका स्तरावर



अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्यामुळे रुग्णांना नाहक होणारा त्रास होणार नाही.

सदरहु डायलेसिस सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय कृष्णाजी वाघमारे, डॉ. शुभम जैस्वाल, दंतशल्यचिकित्सक, डॉ. सबाहत खान, श्रीमती अर्चना मडावी, श्रीमती कादंबिनी तिरपुडे, श्रीमती असुफा अंसारी, इन्चार्ज डायलेसिस सेंटर, शितल सोनवने, थी. नयन पाटील डायलेसिस टेक्निशन व उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथील कार्यरत अधिकारी तथा कर्मचारी उपस्थित होते.

## स्वराज्य संस्थेवर भाजपचा झेंडा फडकविणार - कुंभारे

**तालुका वार्ताहर/कळमेश्वर**

आगामी काळात होणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील जि.प., न.प., पं.स., ग्रामपंचायतमधील निवडणुकीमध्ये भाजपचा झेंडा फडकविणारच असा निर्धार भाजपा नागपूर जिल्हा अध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यकर्ता मेळाव्यामध्ये व्यक्त केला.



कुंभारे यांचा वाढदिवसानिमित्त ११ जुलैला नील फार्म नांदीखेडा, कळमेश्वर येथे भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते. प्रमुख अतिथीमध्ये आ. डॉ. आशिष देशमुख, आ. चरण सिंग ठाकूर, माजी आ. टेकचंद सावरकर, डॉ. राजीव पोतदार, रामराव मोवाडे, आनंदराव ठवरे, संध्या गोतमारे, माजी जि.प. उपाध्यक्ष सुमित्रा कुंभारे, उज्वला बोढारे, किशोर रेवतकर, विजय देशमुख, देविदास मदनकर, आदर्श पटले, दिनेश ठाकरे, धनराज देवके, ईश्वर यावलकर, तालुका भाजपाध्यक्ष प्रमोद हत्ती, राजू गुगल, रवींद्र ठाकूर व अन्य मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की सुनील केदार यांचे कट्टर समर्थक मनोहर कुंभारे यांना भाजपमध्ये प्रवेशासाठी तयार केले. मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घालून दिली व भाजपमध्ये सामील करून घेतले. डॉ. राजीव पोतदार यांची चाणक्य नीती व मनोहर कुंभारे यांच्या मेहनतीने काँग्रेसचे सुनील केदार यांचा पराभव केला. यावेळी आ. आशिष देशमुख म्हणाले की माझ्या विजयामध्ये मनोहर कुंभारे यांचा मोलाचा वाटा आहे. कुंभारे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पत्नी सुमित्रा कुंभारे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संचालन सुरेंद्र शेंडे तर आभार रामराव मोवाडे यांनी मानले.

## धार्मिक स्थळावरील भोंगे उतरविण्याची कार्यवाही सुरू

### पोलिसांचे धार्मिक स्थळाच्या समित्यांना सहकार्याची विनंती

**वार्ताहर/वाडी**

सर्वोच्च न्यायालयाचे दिशानिर्देशानुसार महाराष्ट्र सरकारच्या देवेंद्र फडणवीसच्या महायुती सरकारने ध्वनिप्रदूषण व अन्य बाबी लक्षात घेता घेतलेल्या निर्णयानुसार राज्यात सर्व धार्मिक स्थळावरील भोंगे अर्थात लाऊड स्पीकर काढण्याच्या निर्णयानुसार तसेच नागपूर पोलिस आयुक्तालयाने त्या अनुषंगाने काढलेल्या सख्त आदेशानुसार वाडी पोलिस स्टेशन हद्दीतील सर्व धार्मिक स्थळावरील लाऊड स्पीकर काढण्याची कार्यवाही गत दोन दिवसांपासून वाडी पोलिसांनी सुरू केली आहे.

वाडी पोलिसातर्फे प्राप्त माहितीनुसार शासन व पोलिस विभागाच्या स्पष्ट आदेश लक्षात घेता या संदर्भातील माहिती मंदिर, मस्जिद, बुद्ध विहार गुरुद्वारा या सर्वांच्या व्यवस्थापन मंडळाच्या कमिटी पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना या निर्णयाची माहिती देण्यात आली तसेच भोंगे उतरवून सहकार्याची विनंती करण्यात आली. शासनाचे आदेश आणि पोलिसांची विनंती लक्षात घेता मंदिर, मस्जिद आणि बुद्धविहार व अन्य धार्मिक स्थळावरील लागलेले लाऊड स्पीकर संबंधित समिती पदाधिकाऱ्यांनी काढून टाकण्यास सुरुवात केली आहे. या अनुषंगाने वाडी पोलिस स्टेशन वाडी परिसरातील ४ मंदिरे, ३ मस्जिद, ३ विहारे इ. ठिकाणावरील भोंगे सन्मानपूर्वक उतरवण्यात आले. तसेच इतर भोंगे उतरवण्याची कार्यवाही अन्यदेखील करीत आहे. पोलिसांच्या या कार्यवाहीत कुठेही समितीतर्फे विरोध दर्शवण्यात आला नाही. मात्र, भावनात्मक मुद्दा असल्याने पोलिसांनी अत्यंत सावधानपूर्वक ही कारवाई सुरू केली आहे.

## नगर परिषद डिगडोह येथील उर्वरित सर्व लिपिकांचे समावेशन

**वार्ताहर/वानाडोंगरी**

डिगडोहदेवी नगर परिषद झाल्यानंतर येथील ग्रामपंचायतकालीन कर्मचाऱ्यांचे समायोजन करताना अतिरिक्त ठरलेल्या ८ लिपिकांचे इतरत्र ठिकाणी समावेशन करण्यात आले. २०२३ मध्ये डिंगडोहला नगर परिषदेचा दर्जा मिळाला. त्यावेळी ग्रामपंचायत कालीन सर्व १८ लिपिक व कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासंदर्भात प्रस्ताव होता. मात्र, येथे १० पदे असल्याने महिनाभरापूर्वी १० लिपिकांचे समावेशन करण्यात आले होते. त्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांनासुद्धा हुरहूर लागली होती. जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांचे आदेशान्वे या सर्व ८ लिपिक कर्मचाऱ्यांचे इतर ठिकाणी समावेशन करण्यात आले.

## किट्समध्ये रोजगार कौशल्य या विषयावर दहा दिवसीय कार्यशाळा

**शहर वार्ताहर/रामटेक**

कविकुलगुरू इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी अँड सायंस (किट्स) रामटेकमध्ये रोजगार कौशल्य या विषयावर १० दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते ७ जुलै रोजी झाले. कार्यशाळेमध्ये ७ व्या सेमिस्टरच्या विविध विभागातील ३०० विद्यार्थी सहभागी होणार आहे. पहिल्या स्लॉटमध्ये कॉम्प्युटर आणि मेकॅनिकल विभागातील विद्यार्थी सहभागी असतील.



उद्घाटनप्रसंगी किट्सचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. श्रीकृष्ण चिंचोळकर, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. यशवंत जिभकाटे, डीन व कॉम्पुटर विभागप्रमुख डॉ. विलास महात्मे, केयोर कोइंबटतूरचे रामादोराई सहित इतर शिक्षक, इतर विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. रोजगार कौशल्य कार्यशाळेमध्ये केअर कोइंबतूर व बंगलुरूचे प्रशिक्षक रामादोराई, डॉ. श्रिप्रीया अशोक, जे. दिनकर, सुधीर नाईक, दिनेश जोशी, के. व्ही. वेंकटेश विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीकरिता साक्षात्कार कसा द्यावा, याबद्दल मार्गदर्शन करतील. प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्णा चिंचोळकर, संचालन प्रा. जोतस्ना चव्हान यांनी केले.

# रुग्णांसाठी अत्याधुनिक आरोग्य सेवेची हमी

### आ. डॉ. आशिष देशमुख व डॉ. आयुश्री देशमुख यांचा उपक्रम

**लोकशाही वार्ता/सावनेर**

आ. डॉ. आशिष देशमुख यांचे जनसंपर्क कार्यालय सावनेर येथे सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सेवा देण्यासंदर्भात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या क्षेत्रात कॅन्सरमुक्त अभियान यशस्वीपणे राबविल्यामुळे आ. डॉ. आशिष देशमुख यांची या क्षेत्रातील रुग्णांबद्दल असलेली कळकळ लोकांना दिसून पडली होती. विविध आजारांवर उपचार सेवा प्रदान करण्यासंदर्भात आ. डॉ. आशिष देशमुख व माझी माऊली फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. आयुश्री देशमुख यांनी या कार्यक्रमात




सावनेर-कळमेश्वर तालुक्यातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सेवा उपलब्ध करून देण्याची हमी दिली. आ. डॉ. आशिष देशमुख यांच्या वतीने ग्रामीण भागात विविध आरोग्य तपासणी व उपचार शिबिरेदेखील आयोजित करण्यात येत असतात. हे क्षेत्र रोगराईमुक्त व्हावे आणि नागरिकांना निरोगी जीवन जगता यावे, यासाठी ते सतत प्रयत्न करत असतात. यासाठी लता मंगेशकर हॉस्पिटल हिंगणा रोड नागपूर व रणजित देशमुख दंत महाविद्यालय हिंगणा रोड नागपूरची मदत घेण्यात येते.

याप्रसंगी आ. डॉ. आशिष देशमुख यांनी भविष्यात देखील लता मंगेशकर हॉस्पिटल व रणजित देशमुख दंत महाविद्यालय नागपूरच्या माध्यमातून आपण या मतदारसंघासाठी निरंतर आरोग्य सेवा उपलब्ध करू आणि रुग्णांना उत्कृष्ट उपचार सेवा पुरवू, असे म्हटले. माझी माऊली फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक उपक्रम सुरू आहेत.

लता मंगेशकर हॉस्पिटलच्या माध्यमातून या क्षेत्रातील रुग्णांना अत्याधुनिक आरोग्य सेवा पुरविण्यात येतील, असेही ते यावेळी म्हणाले. रणजित देशमुख दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अभय कोलते यांनी प्रास्ताविक केले. आमदार आ. डॉ. आशिष देशमुख यांना या भागातील रुग्णांविषयी असलेली कळकळ या उपक्रमाच्या माध्यमातून दिसली, असेही ते म्हणाले. याप्रसंगी एलआयसीचे किशोर सहारे, ॲड अरविंद लोधी, प्रफुल्ल मोहटे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. संचालन सोनू नवलिंगे यांनी केले.

## दृष्टिक्षेप

## १६ वर्षांखालील मुलांना 'जुवेनाईल इडिओपॅथिक आर्थरायटिस'चा धोका

**नागपूर :** जुवेनाईल इडिओपॅथिक आर्थरायटिस (जेआयए) हा १६ वर्षांखालील मुलांमध्ये होणारा गंभीर आणि दीर्घकालीन ऑटोइम्यून आजार आहे. ज्यामध्ये सांध्यांमध्ये सूज येते. हा फक्त शारीरिक वाढीमुळे होणारी दुखणी नसून एक गंभीर आजार आहे, जो मुलांच्या शारीरिक वाढीवर, विकासावर आणि संपूर्ण जीवनमानावर परिणाम करू शकतो.

या आजाराची सुरुवातीची लक्षणे लवकर ओळखल्यास वेळीच उपचार करून मुलाचे आयुष्य बदलू शकते. सतत सांधेदुखी, सूज, किंवा हालचालींमध्ये ताठरपणा, सकाळी उठल्यावर सांधांमध्ये जास्त ताठरपणा, जो दिवसभरात कमी होतो, कोणताही अपघात न होता पाय लंगडत चालणे, वारंवार ताप येणे, अज्ञात कारणाने अंगावर पुरळ येणे किंवा सतत थकवा जाणवणे, डोळे लालसर किंवा सूजलेले असणे (यूव्हीआयटिसचे लक्षण असू शकते) अशी लक्षणे कधी-कधी येतात आणि जातात, त्यामुळे निदान करणे कठीण ठरू शकते. पण पालकांनी जागरूक राहिल्यास लवकर उपचार सुरू करता येतात आणि परिणामही चांगले मिळू शकतात, असे या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

> आजार असलेली मुले नेहमी आजारी दिसत नाहीत, पण त्यांना दररोज वेदना आणि थकवा जाणवत असतो, हे लक्षात ठेवा. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आता नवीन बायोलॉजिकल औषधांमुळे जेआयएमुळे होणारी सूज थेट नियंत्रित करता येते. प्रत्येक मुलासाठी खास वैयक्तिक उपचार योजना आणि बालरोग तज्ज्ञांकडून नियमित तपासणी घेतल्यास बहुतांश मुले शिक्षण, खेळ आणि छंद यांचा आनंद कोणतीही अडचण न येता घेऊ शकतात.
>
> **– डॉ. कृष्णा ठकरानी**
> सल्लागार बालरोगतज्ज्ञ, वोक्हार्ट

## सीएसआर निधी सामाजिक संस्थांना द्या, अन्यथा आंदोलन



**नागपूर :** सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधी सामाजिक संस्थांना द्यावा. अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रविभवन नागपूर येथे नुकत्याच आयोजित कार्यशाळेप्रसंगी महाराष्ट्र एनजीओ समितीने शासनाला दिला आहे. सामाजिक संस्थांकरिता महाराष्ट्र एनजीओ समितीच्या वतीने निःशुल्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील २०० सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला होता. कार्यशाळेमध्ये संस्था संघटन व सीएसआर निधी संदर्भात महाराष्ट्र एनजीओ समितीचे राज्य अध्यक्ष डॉ. युवराज येडुरे, राज्य उपाध्यक्षा डॉ. सुनीता मोडक, राज्य चिटणीस एल. के. डोळस तसेच तज्ज्ञ सल्लागार सारिका आटोळे, चंदा गान उपस्थित होते. मागील सात वर्षात नागपूर जिल्ह्यात १२२ कोटींचा निधी खर्च केला गेला. हे कागदोपत्री दाखविण्यात आले. मात्र तो निधी प्रत्यक्षात दिला जात नाही. याकरिता शासन स्तरावर चौकशी समिती नेमण्यात यावी. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कार्यशाळेत करण्यात आली. समाजकार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना सीएसआर निधी द्या. अन्यथा आगामी काळात महाराष्ट्रभर आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र एनजीओ समितीने दिलेला आहे. कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र एनजीओ समितीच्या राज्य सदस्या शीतल पाटील व नागपूर विभागाचे अध्यक्ष सारंग घोटकर यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी नागपूर विभागीय संपर्क प्रमुख अविनाश इनमे, सदस्य तुषार आरघोडे, संध्या भोयर यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सारंग घोटकर यांनी तर संचालन नलिनी शेरकुरे यांनी केले.

### महाराष्ट्र एनजीओ समितीचा शासनाला इशारा

# कळमना प्रादेशिक केंद्रातून घडत आहेत 'फायर मॅन'

### महानगरपालिकेतर्फे संचालित होणारे विदर्भातील एकमेव प्रशिक्षण केंद्र

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूर महानगरपालिकेचे कळमना येथील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र 'फायर मॅन' घडविणाऱ्या एका महत्त्वाच्या संस्थेच्या रूपात उदयास आले आहे. या प्रशिक्षण केंद्रातून गेल्या ९ वर्षात शेकडो उमेदवारांना फायरमॅनचे प्रशिक्षण मिळाले आहे. अनेक ठिकाणी हे उमेदवार आपली सेवा देत आहेत. याशिवाय अग्निशमन जवानांना अधिक दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, म्हणून मनपातर्फे नवीन जलतरण तलाव बांधला आहे. या जलतरण तलावाचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वात अग्निशमन विभागात अत्याधुनिक सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कळमना येथील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात अग्निशमन जवानांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी नवीन जलतरण तलाव तयार केल्याने अग्निशमन विभागाला अधिक बळ मिळाले आहे. नागपूर महानगरपालिकेने शहरातील आगीच्या घटनांवर तसेच आपत्कालीन स्थितीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी, बाजारातील अरुंद रस्ते असलेल्या वस्त्यातील आगीच्या घटनांवर त्वरित नियंत्रण आणण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊनच मनपातर्फे प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात ७ नोव्हेंबर २०१६ करण्यात आली. राज्यभरातील अग्निशमन दलाच्या जवानांना प्रशिक्षण देण्याचे काम प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र करीत आहे. गेल्या ९ वर्षात १४ तुकड्यांच्या प्रशिक्षणातून शेकडो उमेदवारांना दर्जेदार प्रशिक्षण मिळाले आहे.



**नागपुरातील मनपाच्या प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात एकाच वर्षी जानेवारी ते जुलै आणि जुलै ते डिसेंबरदरम्यान दोन बॅच चालतात. सहा महिन्याच्या प्रशिक्षणात उमेदवारांना अग्निशमन विभागाशी संबंधित सर्वच प्रशिक्षण दिले जाते. या सहा महिन्यांत प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबईतर्फे परीक्षा घेतली जाते. दरम्यान, मनपाच्या अग्निशमन जवानाकरीता २ जून २०२५ पासून प्रादेशिक अग्शिनमन प्रशिक्षण केंद्र कळमना येथे जलतरण तलाव सुरू करण्यात आले आहे. लवकरच या जलतरण तलावात अग्निशमन सेवा बजावणाऱ्या जवानाकरीता दोन बॅच मध्ये प्रशिक्षणाची सुरुवात होणार आहे.**

> **नागपूर व विदर्भातील उमेदवारांना मुंबई, पुणे, ठाणे येथे प्रशिक्षणासाठी जावे लागत असे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामुळे विदर्भातील विद्यार्थ्यांना इतरत्र ठिकाणी जाण्याची गरज भासत नाही. या प्रशिक्षण केंद्रामुळे विदर्भात फायर मॅन करिअर म्हणून निवड करणाऱ्या उमेदवारांना पंख दिले आहे. प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात येण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबईतर्फे उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नागपुरातील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासह राज्यातील इतर प्रशिक्षण केंद्रात पाठविले जाते.**

> **या प्रशिक्षण केंद्राचे क्षेत्रफळ १०८८३.७२ चौ.मी असून त्यापैकी २४२.८२० चौ.मी जागेवर प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. प्रशिक्षण केंद्राची इमारत २ मजली असून यात उपमुख्य अग्निशमन अधिकारी व प्रशिक्षण केंद्राचे मुख्य पर्यवेक्षक यांचे कार्यालय, विश्राम कक्ष, कॅन्टीन, स्टोअर रूम, प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरिता २ डॉरमेट्री, मेस व क्लास रूम आहेत. प्रशिक्षणार्थ्यांकरिता कवायत व प्रात्याक्षिकांकरिता पटांगण, त्याचबरोबर प्रशिक्षणार्थ्यांकरिता १ ड्रिल टावरसुद्धा उपलब्ध करून देण्यात आले आहे.**

## डॉ. आनंदराव खडसे यांची वृद्ध कलाकार मानधन समितीवर निवड



**लोकशाही वार्ता/कुही**

कुही तालुका कलाकार संघाच्या वतीने माजी जि.प. सदस्य डॉ. आनंदराव खडसे यांची राजर्षी शाहू ज्येष्ठ साहित्यिक व वृद्ध कलाकार मानधन समितीवर निवड झाली असून ते तालुक्यात अनेक वर्षांपासून सामाजिक व राष्ट्रीय कार्य करीत आहेत. त्यांना नागपूर जिल्हा सांस्कृतिक विभागामध्ये काम करण्याची संधी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. कृपाल तुमाने, संदीप इटकेवार यांच्यावतीने नियुक्ती मिळाल्याबद्दल विदर्भ शाहीर परिषद कुही अध्यक्ष शाहीर रामभाऊ धनंजोडे व सिटीजन फोरम कुही व मानसी सांस्कृतिक कला मंडळ मुसळगावचे सचिव शाहीर कालीचरण शेंडे, रामभाऊ क्षीरसागर, सूरज धनजोडे, रमेश लांजेवार उपस्थित होते. यावेळी कुही तालुका कलाकारच्या वतीने डॉ. खडसे यांच्या जाहीर सत्कार करण्यात आला. प्रसंगी शाहीर नामदेवराव धनजोडे, रामभाऊ रमेश सूर्यवंशी, वसंता लेंडे, नथ्थू पडोळे, नागोराव लांजेवार, गोपीचंद जीभकाटे, चंद्रा पडोळे, निर्मला ढबाले, मुक्ता चकोले, निर्मला चकोले, शांता बर्डे, सुनंदा देशमुख, लता कुतरमारे, पिंटू वडे, कैलास थोटे आदी मान्यवर उपस्थित होते.



## नागपूर विद्यापीठाला मिळणार लवकरच पूर्णवेळ कुलगुरू

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला अखेर पूर्णवेळ कुलगुरू मिळण्याचे संकेत आहेत. याबाबतची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. डॉ सुभाष चौधरी यांचे आधी निलंबन आणि नंतर निधन झाल्याने कुलगुरूपद रिक्त झाले होते. दरम्यानच्या काळात गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रशांत बोकारे यांना कुलगुरू पदाचा प्रभार देण्यात आला. सध्या विभागीय अतिरिक्त आयुक्त डॉ. माधवी घोडे चौरे यांच्याकडे नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार आहे. कुलपती आणि राज्यपाल यांनी कुलगुरू निवडीसाठी समिती नेमली. या समितीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कुलगुरू पदासाठीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. इच्छुक उमेदवारांना आपले अर्ज ७ ऑगस्टपर्यंत दिलेल्या प्रारूपात ई-मेल आणि छापील स्वरूपात पाठवायचे आहेत. कोइंबतूर येथील भारतीय विद्यापीठाच्या गणित विभागातील डॉ. एस सर्वांनन हे या समितीचे नोडल ऑफिसर आहेत.

## संत कबीर आणि मीराबाई यांच्या दोह्यांचा आणि पदांचा भावपूर्ण नजराणा

### युवा कलाकारांच्या प्रस्तुतीला रसिकांची भरभरून दाद



**लोकशाही वार्ता/नागपूर**

'उपज' संस्थेच्या वतीने आयोजित 'मीरा और कबीर : भक्ती से मुक्ती तक' या संगीतमय कार्यक्रमाची भव्य आणि भक्तिमय प्रस्तुती शंकरनगर येथील साई सभागृहात पार पडली. जीवनातील सत्य, प्रेम आणि भक्तीचा संगम असलेल्या संत कबिरांचे भावगर्भ दोहे आणि कृष्णभक्तीत लीन झालेल्या संत मीराबाईंच्या रचनांना रसिकांच्या समोर घेऊन येण्याच्या युवा कलाकारांच्या धाडसाला मोठ्या संख्येने उपस्थित जाणकार रसिकांनी भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमाची संकल्पना आदित्य सावरकर आणि आर्य पुराणकर यांची होती, तर संगीत संयोजन आर्य पुराणकर व ध्वनी संयोजनाची जबाबदारी ऋषभ ढोमणे यांनी समर्थपणे सांभाळली. कार्यक्रमाचे उद्‌घाटन अजय खोलपूरकर, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, श्री सिद्धीविनायक ट्रस्टचे प्रख्यात कलावंत प्रफुल्ल माटेगावकर, छायाचित्रकार गजानन रानडे आणि संगीतकार शैलेश दाणी यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यश खेर, निधी रानडे, आदित्य सावरकर आणि साक्षी सरोदे यांनी आपल्या सशक्त गायनाने रसिकांना भक्तिरसात रंगवले. यश खेर यांनी 'मन लागो यार', 'हलके गाडी हाको' आणि 'झीनी रे झीनी' या पारंपरिक रचना सादर केल्या, तर निधी रानडे यांनी 'सुमीरन बीन', 'करम की गति न्यारी' आणि 'चाकर राखो जी' या भावस्पर्शी रचनांद्वारे वातावरण मंत्रमुग्ध केले. साक्षी सरोदे यांनी 'गढ़ से जो मीराबाई' आणि 'लागी लगन' या गीतांतून मीरेच्या भक्तिभावाची अनुभूती दिली. आदित्य सावरकर यांनी 'शून्य गढ़ शहर' हे निर्गुणी भजन, 'पिंजरा', 'भला हुआ मोरी' यांसारख्या रचनांतील कबिराचे वैचारिक गहिरेपण आपल्या साजेश्या आवाजातून सादरीकरण केले. 'म्हारो प्रणाम' आणि 'मल्हार जाम' ही द्वंद्वगीते कलाकारांनी खास शैलीत सादर करून रसिकांची मने जिंकली. यांच्या स्वरांनी रसिकांना खिळवून ठेवले. रसिकांनी टाळ्यांच्या स्वरूपात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शबरी पुराणिक आणि अवनी काशीकर यांच्या मनमोहक नृत्याभिनयाने कार्यक्रमाची उंची वाढवली तर प्रमोद बावणे, अरविंद उपाध्याय, अथर्व शेष, गौरव टांकसाळे, प्रवीण लिहितकर, निशिकांत देशमुख, विक्रम जोशी आणि महेंद्र वातूळकर या कुशल वादकांनी संपूर्ण कार्यक्रमभर उत्तम साथ दिली. कार्यक्रमाचे अतिशय अभ्यासपूर्ण निवेदन आर्या घटवाई यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन आरजे तेजल यांनी केले.

# स्वाती काळे वस्तू व सेवा कर, नाशिक झोन येथे अपर आयुक्तपदी

**लोकशाही वार्ता/नागपूर**



स्वाती काळे (कोलारकर) यांना महाराष्ट्रातील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागाच्या नाशिक झोनमध्ये अपर आयुक्त पदी पदोन्नती मिळाली आहे. त्यांच्या सेवेतील उल्लेखनीय कारकिर्दीत त्यांनी कर, पर्यटन आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

२०१५ ते २०१९ या कालावधीत त्यांनी पर्यटन व्यवस्थापक (जनरल मॅनेजर)आणि सांस्कृतिक कार्यविभागाच्या संचालक म्हणून काम पाहिले. या काळात महाराष्ट्राच्या पर्यटन आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी व्यवसाय कर, सह आयुक्त तसेच जीएसटी सहआयुक्त, मुंबई पदावर कार्यरत राहून कर प्रशासनात महत्त्वाची भूमिका साकारली. एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या स्वाती काळे यांनी साहित्य आणि ज्ञानप्रसार क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी 'दर्पण' या आंतरविभागीय कर मासिकाचे संपादन केले, ज्याला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. त्यांच्या 'येस्टरडे, टुडे, टुमॉरो ऑफ इनडायरेक्ट टॅक्सेशन' या पुस्तकाला अप्रत्यक्ष करव्यवस्थेवरील त्यांच्या सखोल अभ्यासासाठी मोठे यश मिळाले आहे. प्रशासकीय आणि व्यावसायिक यशांबरोबरच त्या एक सुप्रसिद्ध लेखिका आहेत. त्यांनी 'गोष्टीपालिकडचे महाभारत', 'वेध संस्कृतीचा' या मराठी पुस्तकांचे लेखन केले आहे. तसेच, 'डॉगबॉय', 'आय एम अदर यू', 'टेन इंस्पायरिंग टीचर्स इन द वर्ल्ड' यासारख्या पुस्तकांचे मराठीत भाषांतर करून त्यांनी साहित्यक्षेत्रात आपली छाप पाडली आहे.




विश्व संवाद केंद्राच्या वतीने रविवार, १३ जुलै रोजी संध्याकाळी ५.३० वाजता धरमपेठ येथील वनामती सभागृहात देवर्षी नारद पत्रकार सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी वर्तमानपत्रांच्या गटातून पत्रकार डॉ. योगेश प्रकाश पांडे, दृकश्राव्य माध्यमांतून योगेंद्र तिवारी, छायाचित्रकार गटातून सतीश राऊत, पर्यावरण पत्रकारिता गटात राखी चव्हाण, क्रीडा पत्रकार गटातून नरेश शेळके, सोशल इन्फ्लुएन्सर गटातून आशिष भारतवंशी, सिटीझन / स्तंभकार गटातून वैभव बावनकर, उत्कृष्ट आरजे गटातून आरजे पल्लवी, जागरण/साप्ताहिक पत्रिका गटातून प्रज्ञालोक, पोर्टल/वेबसाईट गटातून 'नागपूर न्यूज' यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## बालगंधर्व स्मृती नाट्यगीत गायन महोत्सव उद्या

**लोकशाही वार्ता/नागपूर**

मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने कार्यरत बालरंगभूमी परिषद, नागपूर शाखेच्या वतीने व दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्व. नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नाट्यगीत गायन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

मंगळवार, १५ जुलै रोजी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० या वेळेत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, सिव्हिल लाईन्स येथे होणाऱ्या या महोत्सवात शहर व परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाल रंगभूमी परिषदच्या अध्यक्षा आभा मेघे राहणार असून दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या संचालिका आस्था कार्लेकर प्रमुख पाहुण्या असतील.

कार्यक्रमाला दमक्षेचे सहायक संचालक (कार्यक्रम) दीपक कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय नागपूरचे सहायक संचालक संदीप शेंडे यांची उपस्थिती राहणार आहेत. बक्षीस वितरण समारंभ संध्याकाळी ५ वाजता होईल. या महोत्सवाला सर्वांनी उपस्थित राहून बाल कलाकारांचे मनोबल वाढवावे, असे आवाहन बालरंगभूमीच्या अध्यक्ष आभा मेघे, कार्याध्यक्ष संजय रहाटे, नाट्यगीत गायन महोत्सवाचे संयोजक डॉ. अनिल कवडे तसेच अनिल देव, किशोर बत्तासे व बालरंगभूमी परिषद नागपूर कार्यकारिणीने केले आहे.

# चिचभवन येथे रस्त्यावर आढळला अजगर

### साप बघण्यासाठी नागरिकांची गर्दी : पावसाळ्यात कोरड्या जागेच्या शोधात बाहेर येतात साप

**लोकशाही वार्ता/नागपूर**

चिंचभवन येथील भवन्स स्कूलच्या समोरील रस्त्यावर शनिवारी रात्री ९ वा. च्या सुमारास अजगर जातीचा साप आढळून आला. त्याला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, पावसाळ्याच्या दिवसात साप बाहेर येण्याच्या घटना वाढत असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन 'हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर' संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर संस्थेच्या प्रतिनिधींना रस्त्यावर अजगर निघाला असल्याबाबत माहिती मिळताच संस्थेचे सर्पमित्र आशिष खाडे, सचिन काकडे, सचिन झोडे यांनी घटनास्थळ गाठले. तसेच गर्दीला बाजूला सारत ५ फूट लांबीच्या अजगराला शिताफीने पकडले. तसेच हा साप स्वस्थ असल्याची खात्री करून त्याला निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले. हा साप बिनविषारी असून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अनुसार शेड्यूल १ मध्ये येतो. सध्या पावसाचे दिवस सुरू असून शहरात, ग्रामीण भागात साप घरात, रहिवासी भागात साप शिरण्याच्या घटना वाढत आहे. मनीषनगर, बेसा, पिपळा, बेलतरोडी, चिंचभवन, खापरी, मनीषनगर, नरेंद्रनगर, जयताळा, सोनगाव, पारडी, कोराडी रोड, खरबी, दिघोरी, उमरेड रोड, नरसाळा, हुडकेश्वर या क्षेत्रात जास्त प्रमाणात साप निघत आहेत, असे संस्थेतर्फे सांगण्यात आले.



### पावसाळ्यात साप येतात बिळाबाहेर

**पावसाळ्याच्या दिवसात जमिनीत पाणी अधिक मुरल्याने, सापाच्या बिळात पाणी शिरल्याने साप बिळाबाहेर येतात व कोरड्या जागेच्या शोधात अथवा भक्ष्याच्या शोधात घरात, कम्पाउंडमध्ये शिरतात, अडगळीच्या जागेवर दडून बसतात तसेच ह्या ऋतू मध्ये काही विषारी-बिनविषारी सापांची पिल्ले सुद्धा बिळाबाहेर पडतात. त्यामुळे झुडपी क्षेत्र, मोकाट जमिनी, नदी-नाले असलेल्या राहिवासी परिसरात साप निघण्याचे प्रमाण अत्याधिक वाढले आहे. सावधगिरी न बाळगल्यामुळे सर्पदंश होण्याची संभावना अधिक असते.**

### काळजी घ्या, सर्पदंश टाळा – स्वप्निल बोधाने



**शेतात काम करीत असताना पायात लाँग बुटचा वापर करावा, घराच्या परिसरात अथवा कम्पाउंडमध्ये असलेल्या बिनकामाच्या वस्तूंची विल्हेवाट लावावी. परिसरात स्वछता बाळगावी, घरा सभोवताल असलेली अनावश्यक वेली, झुडपे काढून टाकावी, ड्रेनेज पाईपला जाळी बसवावी, जमिनीवर झोपत असताना घराच्या दरवाजाच्या खालील फटीत कापड लावावे. रात्रीच्या अंधारात घराबाहेर पडत असताना टॉर्चचा वापर करावा. सर्पदंश झाल्यास साप शोधण्यास, साप मारण्यात वेळ घालवू नये, साप चावल्यास घाबरू नये, मानसिक संतुलन स्थिर ठेवावे. वेळ न गमावता त्वरित जवळचे शासकीय रुग्णालय गाठावे. ग्रामीण भागातील लोकांनी प्राथमिक स्वास्थ केंद्र रुग्णालय गाठावे, असे आवाहन संस्थेचे सर्पमित्र व माजी पशुकल्याण अधिकारी स्वप्निल बोधाने यांनी केले आहे.**

## गोधनी रेल्वे वसाहतीतील प्लॉट धारकांना २७ वर्षांनंतरही ताबा नाही

### आमदार अभिजित वंजारी यांचा अधिवेशनात सवाल

**लोकशाही वार्ता/नागपूर**

राज्यात सुरू असलेल्या २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात नागपूरच्या गोधनी रेल्वे परिसरातील म्हाडाच्या प्लॉट वाटपासंदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न विधिमंडळात उपस्थित करण्यात आला. आमदार अभिजित वंजारी यांनी प्रश्नोत्तराच्या तासात ही गंभीर बाब मांडली.



वंजारी म्हणाले, १९९६ साली म्हाडाने गोधनी रेल्वे या भागात ३१६ लाभार्थ्यांना प्लॉट वाटप केले. मात्र, आज २७ वर्षे उलटूनही या नागरिकांना प्रत्यक्ष ताबा मिळालेला नाही. गेल्या दीड वर्षांपासून मी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करतो आहे. यातील फक्त १०३ जणांनाच प्रत्यक्ष प्लॉट मिळाले असून, उर्वरित नागरिक अजूनही वाटच बघत आहेत. ते पुढे म्हणाले, हा भाग सध्या नागपूर महापालिकेच्या हद्दीबाहेर असून नगरपरिषद हद्दीत येतो. नगरपरिषद डेव्हलपमेंट चार्जेस भरण्याची अट घालते, तर म्हाडा विकासकामे पूर्ण करेल असे सांगते. अशा परिस्थितीत गेल्या दोन दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या या प्रकरणात सरकारने स्पष्ट भूमिका घेऊन संबंधित नागरिकांना तातडीने प्लॉटचा ताबा द्यावा. वंजारी यांनी हा मुद्दा विशेष प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित करून २७ वर्षांपासून घराच्या प्रतीक्षेत असलेल्या नागपूरकरांच्या न्याय हक्काची मागणी केली.